RNI No. MAHMAR48925

# स्वयम् ब्राह्मण सेवा

अंक १ । मुंबई । जानेवारी २०२२



सस्नेह नमस्कार..

आज सुमारे दीड दोन वर्षांनंतर आपल्याशी, 'स्वयम'मधून संवाद साधताना आनंद होतोय!

कोरोना महामारीच्या बिकट काळात आपण आपले जे सहृद गमावले, त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

आपण आपले त्रैमासिक पुन्हा नव्या उत्साहात सुरू करत आहोत..

ज्यायोगे आपण परस्परांशी संवाद साधू शकतो..

आपले लिखाण नेहमीच स्वागतार्ह!

आपण वैचारिक तसेच हलकेफुलके लिखाण, मग कथा कविता असतील त्या पाठवाव्यात..

सध्या अजून कोरोना पूर्णपणे निवळला नाही.

तोपर्यंत online पद्धतीने आपण त्रैमासिक प्रसिद्ध करणार आहोत.

आपल्या आरोग्याची काळजी घ्या..

मास्क वापरा..

धन्यवाद..

**– कौस्तुभ महाजन**
प्रमुख कार्यवाह

■ कार्यकारी संपादक
**श्री. योगेश यशवंत केळकर**

■ स्वयम् संपादकीय मंडळ
**श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
**श्री. अनिरुद्ध सदाशिव गोडसे**
**श्री. कौस्तुभ वसंत महाजन**
**श्री. सतीश कृष्णाजी विद्वांस**
**सौ. कल्पना वसंत साठे**
**सौ. अधिता अर्चिस लेले**

■ संपादन सहाय्य
**श्री. मनोज आचार्य**

■ मुखपृष्ठ
**श्री. मनोज आचार्य**

■ अक्षरजुळणी व मांडणी
**अद्वैत प्रिंट्स**

■ संपादकीय विभाग पत्रव्यवहार
**स्वयम, ब्राह्मण सेवा मंडळ**
भवानी शंकर रोड, दादर (प.)
मुंबई–४०००२८
दूरध्वनी : २४२२९११८
२४३७१९४९

कार्यालयीन वेळा (रविवार बंद)
सकाळी ८.३० ते १२.३०
सायंकाळी ४.३० ते ८.३०

ई–मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट : www.bsmdadar.com

# सुस्वरांची संवेदनशील गायिका - सुमन कल्याणपूर

**मनोज शशिकांत आचार्य**

**प**न्नास आणि त्या पुढील तीन दशकात विशेष रचना कौशल्य असणाऱ्या गीतकारांकडे आणि प्रतिभावान संगीतकारांकडे तसेच स्वरांचे उपजत अंग असणाऱ्या गायक–गायिकांकडे जात्याच कमालीची प्रगल्भ प्रतिभा होती. त्यामुळेच हिंदी सिनेमामधील निरनिराळ्या प्रकृतीच्या, आशयाच्या अर्थपूर्ण रचना रसिकांना ऐकायला मिळाल्या. त्या रचना निश्चितपणे लक्षणीय होत्या, अजरामर होत्या.



गीतकारांनी त्या रचना सिनेमातल्या प्रसंगानुरूप लिहितानासुद्धा त्यात संधी मिळेल, तिथे समाजाला जीवनाचे सहज, सोपे तत्त्वज्ञान समजावण्याचा प्रयत्न केला. शिवाय गीतकारांनी त्या रचनांद्वारे स्वत:ची ध्येयवादी वैचारिक भूमिका मांडण्याचादेखील यशस्वी प्रयत्न केला. इतकेच नाही तर, विसंगत वाटणाऱ्या जीवन व्यवहारांचे यथार्थ चित्रणही आपल्या रचनांमधून मांडले. ते मांडताना कोणतीही तडजोड न करता आपल्या लेखणीशी ते प्रामाणिक राहिले. तोच भाग संगीतकारांचा, त्यांनी त्या रचनांना चाली देताना समाजात रुजलेले शास्त्रीय ख्याली ठेके वा पारंपरिक लयबंध यांचा वापर करतानाच, आधुनिक स्वरांची साथ घेतली, तरीही त्यात सुरेलपणा अधिक टिकवला, नव्हे रुजवला. त्यामुळे त्या सर्व रचनांना अमरत्त्व प्राप्त झाले.

संगीतकारांच्या बुद्धिवान साहाय्यकांनी वाद्यवृंदांसाठी रचलेली स्वरावली केवळ श्रवणीयच नव्हती, तर ती त्या त्या रचनांच्या बौद्धिक पातळीनुसार होती. शिवाय त्या रचनांतील शब्दांना आणि संगीतकारांच्या चालींना न्याय देणारी अशीच होती. म्हणूनच त्याकाळातील अनेक हिंदी सिने–गीते ही गीतकार, संगीतकार आणि गायक–गायिका यांच्या अफाट मेहनतीमुळे रसिकांच्या ह्रदयाचा भाग बनली.

१९५० ते १९८० पर्यंतच्या काळात हिंदी सिने–संगीतात गायन क्षेत्रात पार्श्वगायिकांमध्ये लताबाई, आशाबाई ह्या दोन पार्श्वगायिका आपल्या अलौकिक गायन क्षमतेच्या आणि रेकॉर्डींग तंत्राच्या उत्तम ज्ञानाच्या ताकदीवर अग्रेसर राहिल्या. त्या आधीच्या १९४० ते १९५० ह्या दशकातील पार्श्वगायिका जोहराबाई अंबालेवाला, अमीरबाई, नूरजहाँ, खुर्शीद, शमशाद, सुरैया, राजकुमारी यांच्या स्वच्छ, लखलखीत आणि धारदार आवाजांना लताबाई आणि आशाबाई या दोघींनी अक्षरश: शह देत, सिनेसंगीतात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले. तसेच स्वतःला सिद्ध करण्याचे फार मोठे आव्हानसुद्धा जिद्दीने पेलले. आणि त्या दोघी खरोखरच अशा अग्रेसर झाल्या की, त्यांच्या आवाजाचे गारूड जवळजवळ त्या काळातील सगळ्याच संगीतकारांवर होते. त्यातही लताबाईंच्या आवाजाचा प्रभाव हा अधिकच होता. याचे कारण त्यांच्याकडे ध्वनिमुद्रणासाठी सुयोग्य असणारा चमकदार आणि तिन्ही सप्तकात लिलया फिरणारा विलक्षण स्वर होता. तसेच गायन–तंत्राचे जन्मजात सुयोग्य भान होते. त्याबरोबरच कमालीची आकलनशक्ती, उच्चारणाची नजाकत, आकर्षक स्वरसौंदर्य टिकवण्यासाठीची जबरदस्त मेहनत, शिवाय आलाप, तान आणि हरकत, मुर्की, मींड, कण या गायनकलेतील गुणांचा सखोल अभ्यास हे अधिक ठासून भरलेले होते.

लताबाई–आशाबाईंच्या सोबतीने १९४९ ते १९७५ पर्यंत आणखीन काही गुणी गायिका गीता दत्त, सुधा मल्होत्रा, मुबारक बेगम आपल्या गुण वैशिष्ट्यांसह खूप

छान गात होत्या. इतक्या की, त्यांनी आपल्या नावावर काही गाणी अशी करून ठेवली, की ती गाणी त्यांच्या आवाजाशिवाय दुसऱ्या आवाजात आपण ऐकूच शकणार नाही. या तिघींमध्येसुद्धा गीता दत्त बऱ्यापैकी आघाडीवर होती. याचे कारण गीता दत्त ही गायिका कधी गळ्याने नाही तर, आत्म्याने गायली. कमालीचा व्याकूळ आवाज. जणू आर्त गाणी गाण्यासाठीच त्यांचा जन्म झाला होता. गीता दत्त म्हणजे पार्श्वगायनाच्या आभाळातले आनंद देणारे इंद्रधनुष्य होते, असेच म्हणावे लागेल. या सगळ्याजणींत एक आणखीन मनस्वी, सात्त्विक, विलक्षण मधुर, कोमल, अलौकिक आकलनशक्ती आणि ध्वनिमुद्रणासाठी सुयोग्य आवाज १९५४ मध्ये 'मंगू' या हिंदी चित्रपटाच्याद्वारे पार्श्वगायनाच्या क्षेत्रात दाखल झाला होता. पण काहींच्या आयुष्यात गुणवान असूनही परीघावरच राहण्याचा योग असतो. तसा ह्या आवाजाच्या बाबतीत पुढे घडत गेले. म्हणजे परिपक्व, परिणत, सफाईदार, गोड मुलायम आवाज असून आणि अनेक भाषांमधील सिनेगायनात बरेच मोठे योगदान असूनदेखील, हा आवाज अनेक गोष्टींत उपेक्षितच राहिला. तो आवाज होता स्वरभाव विलासिनी सुमन कल्याणपूर यांचा.

त्यांच्या एकूण कारकिर्दीचा गायकीच्या अंगाने आलेख मांडताना, या गायिकेच्या गायनातील सृजनशीलता, त्यातील भावतत्त्व, बुद्धिवैभव आणि त्यांच्यातील संवेदनशील कलाकार उलगडून दाखवावा, हीच इच्छा आहे.

सुमनताईंनी शास्त्रीय संगीताचे प्राथमिक शिक्षण अगदी सुरुवातीला म्हणजे विद्यार्थीदशेत असताना, शेजारीच राहणाऱ्या संगीतकार केशवराव भोळे यांच्याकडून घेतले. त्यात सूर म्हणजे काय, तो कसा लावायचा, आपल्या सुराच्या पट्टीनुसार तानपुरा कसा लावायचा इत्यादीचे शिक्षण केशवरावांकडून त्यांना मिळाले. त्यानंतर सुगम संगीताचे धडे संगीतकार यशवंत देवांकडून घेतले. मग पुढे अगदी रीतसर शास्त्रीय संगीत उस्ताद अब्दुल रहमान खान आणि मास्टर नवरंग यांच्याकडून घेतले. सुमनताईंची गायनातील प्रगल्भता केशवराव भोळ्यांनी ओळखली होती. (त्यावेळी ते मुंबई आकाशवाणीवर संगीत सल्लागार होते.) म्हणून त्यांनी आकाशवाणीसाठी यशवंत देवांना सुमनताईंचे एक गाणे बसवून द्यायला सांगितले. त्यानुसार ''पाहते सदा देवा..'' हे गाणे समनताईंनी आकाशवाणीसाठी पहिल्यांदाच गायले. त्यानंतर १९५३ साली सुमनताईंच्या घरी एकदा केशवराव भोळे, डी.बी.शिल्पकार जोग आणि त्यांचे मेव्हणे, बेबी शकुंतला आले असताना आणि अजून कोणी निर्माता पाठीशी उभा नसताना 'शुक्राची चांदणी' नावाच्या एका मराठी चित्रपटाची निर्मिती करायचे ठरले. त्याचे संगीत यशवंत देव देणार होते. मग 'शुक्राची चांदणी' चित्रपटासाठी यशवंत देवांनी स्वतःच रचलेले गीत ''प्रभू तुझ्या विश्वामध्ये काय कमी आहे...'' हे गीत बॉम्बे फिल्म लॅबोरेटॅरीत सुमनताईंकडून गाऊन घेतले. चित्रपटासाठी सुमनताईंचे हे पहिलेच गीत पण दुर्दैवाने चित्रपट पडद्यावर आलाच नाही. तरी त्या गीताने सुमनताईंचा पार्श्वगायनाच्या क्षेत्रात प्रवेश मात्र झाला होता.

१९५२-५३चा काळात पनवेल येथे यशवंत देवांच्या



भावसंगीताच्या एका गायनाच्या कार्यक्रमात तुडुंब गर्दी झाली होती. अनेक नामवंतानी त्या कार्यकमाला आपली हजेरी लावलेली होती. कार्यक्रमाला अजून सुरुवात झाली नव्हती. स्टेजचा पडदा अजून बाजूला सारला गेला नव्हता आणि अचानक पडद्यामागून मोजक्या वादकांच्या साथीने मधुर आवाजातले लताबाईंचे १९५२ मधील 'नौ बहार' चित्रपटातले लोकप्रिय मीरा भजन ''एरी मै तो प्रेम दिवानी...'' रसिकांच्या कानी पडले. रसिकांमध्ये क्षणभर चुळबुळ सुरू झाली. अरे, ही रेकॉर्ड तर नक्कीच नाही, वाद्यवृंद मोजकाच आहे आणि आवाज तर लताबाईंचा वाटतोय! त्या आल्या आहेत की काय? त्यामुळे रसिक अधिकच आतुरपणे पडदा बाजूला होण्याची वाट पाहतात. त्या आतुरतेतच भजन संपते आणि पडदा बाजूला होतो. माईक समोर मोजक्या वादकांसह एक तरुण पंधरा-सोळा वर्षांची मुलगी बसलेली दिसते, तेव्हा यशवंत देव माईक समोर येऊन रसिक प्रेक्षकांना सांगतात, की आत्ता आपण जो आवाज ऐकलात तो लताबाईंचा नव्हता, तो होता सुमन हेमाडी या गोड गळ्याच्या गायिकेचा. हा सुमनताईंचा आणि रसिक श्रोत्यांचा पहिला परिचय. (माझ्या मते खरे तर, हाच परिचय पुढच्या काळात त्यांच्या करिअरला फटका देणारा ठरला.)

अगदी स्पष्ट बोलायचे झाल्यास, सुमनताईंच्या गळ्याची तुलना अकारण लताबाईंच्या गळ्याशी केली गेली. प्रत्येक गायक / गायिकेकडे स्वत:चा नैसर्गिक आवाज असतो. शरीरशास्त्राच्या दृष्टीने प्रत्येकाचे स्वरयंत्र कसे आहे, त्यांच्या घशाची वरची पोकळी, नाकाचा अनुनासिक उच्चार आणि तोंडाची, गळ्याची ठेवण यांच्या क्रियांवर स्वराची विशेषता अर्थात आवाजाची मृदुता, कोमलता त्याचबरोबर तीव्रता अथवा स्वराची उतार-चढावाची क्षमता अवलंबून असते. या उपरांत टाळू, जीभ, दात आणि ओठ यांच्या मदतीने स्वरांची उत्पत्ती होते, असे स्वरशास्त्रसुद्धा सांगते. त्यामुळे कोणत्याही गायक वा गायिकेची परस्पर तुलना करणे अयोग्यच आहे. सुमनताईंचा आवाज पटकन कानावर पडला वा ऐकला की, लताबाईच्या आवाजाचा भास होतो, हे असे समजणे एखाद्या सामान्य रसिकांच्या बाबतीत एकवेळ ठीक आहे. मात्र दोघींचे आवाज बारकाईने ऐकले की कळते, सुमन कल्याणपूर यांच्या आवाजाचा पोत वेगळा आहे. लताबाईंच्या आवाजापेक्षा सुमनताईंचा आवाज हा अधिक बारीक, मधुर, कोमल आहे. त्यात एक प्रकारची स्निग्धता असल्यामुळे, स्वरशास्त्रानुसार त्यांच्या स्वराचा तीक्ष्णपणा लताबाईंच्या स्वराच्या तीक्ष्णपणापेक्षा थोडा कमी आहे. आता ही गोष्ट नैसर्गिक आहे. म्हणजे, हा त्या आवाजाचा काही दोष नाही. तरीही, वरचे स्वर घेताना फारसे निमुळतेपण न आणता परिणाम साधण्याची क्षमता नि:संदेह त्यांच्याकडे होती. न खटकता, रूंदसर स्वर लावण्याची लकब तर कौतुक करण्यासारखी होती. शिवाय लगावातील सफाई इतकी सहज, की संगीतकाराला गीताला चाल कशी देऊ, हा प्रश्न पडू नये. म्हणून असे वाटते की त्यांच्या आवाजाचा अभ्यास जसा व्हायला हवा तसा झालाच नाही. फक्त लताबाईंच्या आवाजाचा भास आहे, म्हणून या गुणी गायिकेला दुय्यम स्थान दिले गेले. याचा दोष मी संगीततज्ज्ञ आणि संगीतकार (कारण कित्येक संगीतकारांनी लताबाईंच्या आवाजाचे आपल्यावरील गारूड लक्षात ठेवूनच, चाली तयार केल्या आणि गायला मात्र सुमनताईंना लावल्या), सिनेसंगीत समीक्षक (कारण मंगेशकर मोनोपोली, आणि लताबाईंनी सुमनताईंना गाऊ दिले नाही, असे अकारण सातत्याने लिहित राहिले.) आणि रसिकांनाही देईन. (कारण लताबाईंसारखा आवाज म्हणूनच त्यांनी स्वत:च्या मनात त्यांची तशी अकारण प्रतिमा तयार केली) शिवाय लताबाईंच्या जवळपास जाऊ शकणारा, हाच एकमेव गळा, असे सार्थ वर्णन सातत्याने प्रत्येक ठिकाणी केले गेले. त्यामुळे तेच बहुदा या गायिकेचे दुर्दैव ठरले!! सदर लेखात मी सुमनताईंच्या समृद्ध गायकीचा विशेष सांगणारी आणि फारशी रसिकांनी न ऐकलेल्या मराठी बरोबरच विविध भाषेतल्या काही निवडक गीतांविषयी सांगणार आहे.

१९५६मध्ये 'दिसत तसं नसतं' या मराठी चित्रपटातसुद्धा ग. दि. माडगुळकरांची खेळकर शब्दरचना असलेले संगीतकार वसंत प्रभू यांनी स्वरबद्ध केलेले आणि सुमनताई, वसंतराव देशपांडे यांनी गायलेले अतिशय अविट गोडीचे युगलगीत 'सांग ना मला गडे, जायचे कुणीकडे?' या गीताच्या चालीतील ताजेपणा आणि सुमनताई आणि वसंतराव देशपांडे यांच्या स्वरातील एक टवटवीतपणा, अवखळपणा मनाला भावतो. सुमनताईंच्या स्वरातील मधुरता व तरलपणा आणि पाण्यासमान नितळपणा निव्वळ अलौकिक. १९६७ सालात प्रदर्शित झालेला'स्वप्न तेच लोचनी' या चित्रपटातील संगीतकार आदिल अहमद यांनी राग देसकार आणि भूपालीवर आधारित आकर्षक सुरावटीचे आणि शांताबाई शेळके यांनी लिहिलेले 'एक एक विरते तारा, आसमंत ये आकारा' हे गीत म्हणजे सुमनताईंच्या स्वरातील प्रसन्नतेचा स्थायीभाव, तार स्वर, गीताच्या सुरुवातीला एकदाच बालगंधर्व शैलीची तान तसेच शब्दांवर रुंजन-गुंजन झाल्याने निर्माण झालेली आनंद डवरवणारी जाणीव अतिशय परिणामकारक झाल्याने, हे गीत ऐकताना श्रोता मंत्रमुग्ध होतो. हे गीत उत्कृष्ट असूनही फार गाजले नाही. १९६५ सालात प्रदर्शित झालेला 'तोची साधू

ओळखावा' या चित्रपटातील शांताबाई शेळके लिखित आणि संगीतकार हेमंत-केदार यांनी राग अहिर भैरवमध्ये स्वरबद्ध केलेले 'शोधू कशाला मी कुठे...' हे गीत म्हणजे सुमनताईंच्या स्वरातील भरीवपणा, प्रगल्भ आलाप, कसदार फेक आणि कान दिपवणारा भावुकपणा किती अलभ्य होता, हे पटवून देणारे होते. या गीतातील वाद्यवृंदातील सतार आणि अकॉर्डियन यांचे वादन कौशल्यही रागसौंदर्य वाढवणारे होते. १९६७ सालातील 'पाठचा भाऊ' या चित्रपटामधील जगदिश खेबुडकर लिखित भावपूर्ण शब्दरचना असलेल्या 'काय बाई झालं माझ्या मनाला...' या गीताला संगीतकार राम कदम यांची लोकगीताच्या वळणाने जाणारी चाल दिलेली. ती भुरळ पडावी अशीच होती. त्याला सुमनाईंचा गायन तंत्राचे उपजत भान असलेला स्वर लाभल्याने ते गीत यशस्वी ठरते. १९६५ सालातील 'राजगडचा राजबंदी' या चित्रपटातील राजा बढे लिखित आणि संगीतकार डी.पी. कोरगावकर यांनी राग बिहाग सादृश्य स्वरबद्ध केलेले 'आनंद मनीं माईना कसं ग सांवरू?...' या गीताला सुमनताईंचा चमकदार स्वर लाभल्याने, छोट्या हरकतींनी सजविलेल्या जागांमुळे तसेच भावार्थ आवरणाचा उच्चार या विशेषांनी नटवल्यामुळे गीताच्या गुणवत्तेची उंची वाढली.

अशी अनेक अविट गोडीची मराठी गीते सुमनताईंनी दत्ता डावजेकर, वसंत पवार, सुधीर फडके, राम कदम, प्रभाकर जोग, विश्वनाथ मोरे, बाळ पार्डे यांसारख्या गुणी संगीतकारांकडे गायली त्यातील काहींनाच प्रसिद्धी मिळाली, तर काहींना हवी तशी फारशी प्रसिद्धी मिळाली नाही हे दुर्दैव. विश्वनाथ मोरे यांच्याकडे सुमनताईंनी गायलेले मंगेश पाडगावकर लिखित भावगीत 'शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुला...' संथ लयीतील, मध्ये मध्ये द्रुत हरकतींनी सजलेली राग मारव्यातील स्वररचना सुमनताईंच्या गायन सामर्थ्यस्थानांना न्याय देते. वर उल्लेख केलेली निवडक गीते ऐकली की, वाटते सुमनताईंच्या आवाजातल्या क्षमतांचा वापर मराठी संगीतकारांनी ' लता इफेक्ट' मिळवण्याचे धोरण बाजूला ठेवून केला त्यामुळे या गीतांमध्ये सुमनताईंच्या गायकीचा ठसा निश्चितच उमटला.

मराठी-हिंदी व्यतिरिक्त बंगाली, ओडिसी, असमी, छत्तीसगढ़ी, मैथिली, भोजपुरी, मागधी, राजस्थानी, गुजराती, कन्नड, अशा अनेक भाषेतील चित्रपटातील गीते सुमनताईंनी गाताना त्या त्या भाषेचा लहेजा, भाषिक शैलीचे वळसे, खाचाखोचा आणि आकार-उकार, त्या त्या भाषेसाठी स्वर कसा लावायचा, त्याचा पोत काय असला पाहिजे, त्याचा झोत कुठे असला पाहिजे त्यातील शब्दांचा स्वरांशी असलेला संबंध, त्या शब्दांच्याच आधारे होणारी बोलबढत, नीट समजून घेतानाच अत्यंत विचारपूर्वक आपल्या गायकीतील गुण ओतले. आणि त्या विविध



भाषेतील गीतांना समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. विजय पाण्डेय निर्मित छत्तीसगढ़ी पहिला चित्रपट 'घर द्वार' (१९६५)मधील 'सुन-सुन मोर मया पीरा के संगवारी रे...(रफी, सुमन) ', 'जउन भुईयाँ खेले, जउन भुईयाँ बाढ़े...', 'झन मारो गुलेल' ही सोलो गाणी सुमनताईंनी गायली होती. संगीत दिले होते जमाल सेन यांनी. आणि गीते हरि ठाकूर यांनी लिहिली होती. ही सगळी गीते अधिक करून छत्तीसगढ़ी लोकगीतावर आधारित होती त्यातील मधुरपणा, जबरदस्त ठेका आणि रसरशीतपणा तसेच वाद्यांच्या सुरेख मेळामुळे ती गीते अतिशय श्रवणीय झाली. त्यानंतर मनु नायक निर्मित आणखीन एक छत्तीसगढ़ी दुसरा चित्रपट 'कहि देबे सन्देस'(१९६५) संगीतकार मलय चक्रवर्ती आणि गीते राजदिप यांनी लिहिली होती. या चित्रपटातील भावपूर्ण बिदाई गीत 'मोरे अंगना के सोन चिरईया नोनी...' म्हणजे सुमनताईंच्या स्वरातील विरह, वात्सल्य, दुःख, शीतलता अशा सगळ्या

भावभावना तसेच छत्तीसगढ़ी भाषेच्या सुयोग्य लगाव त्यांच्या स्वरातून आपल्या मनाचा ठाव घेतात. या बिदाई गीतातील त्यांचा स्वर म्हणजे 'लोण्यात खडीसाखर मिसळलेला अवीट मधुर स्वर' असेच त्याचे वर्णन करता येईल. मैथिली भाषेतील पहिला चित्रपट 'ममता गावए गीत'(१९६२) 'भरि नगरी में शोर बौआ मामी तोहर गोर मामा चान सन...', 'तोहें जानु जाह विदेश...' गीते सुमनताईंनी गायली होती. रबीन्द्र महिंद्र दुओ यांनी लिहिली होती आणि संगीत श्याम शर्मा यांनी दिले होते. या तीनही भाषेतील गीते लोकप्रिय तर आहेतच, शिवाय तिथल्या रसिकांना आजही मंत्रमुग्ध करतात.

त्यांनी भोजपुरी चित्रपटातील अनेक गीते एस. एन. त्रिपाठी, गुलाम मुहोम्मद, चित्रगुप्त, बाबू सिंग, रॉबिन चॅटर्जी ते अगदी नदिम-श्रवण यांच्या संगीत निर्देशनात गायली. शिवाय हिंदी सिने-संगीतात मोठ्या संगीतकारांकडे गाताना लो बॅनरच्या चित्रपटांना संगीत देणाऱ्या अनेक संगीतकारांकडे जसे- बिपिन-बाबुल, शार्दूल क्वात्रा, पंडित हरबंस लाल, दिलिप ढोलकिया, अजित मर्चण्ड, दत्ताराम, इक्बाल कुरेशी, ज्ञान दत्त, हनुमान प्रसाद, मनोहर, रॉबिन बॅनर्जी (या संगीतकाराकडे सुमनताई कायम प्रमुख गायिका होत्या. सुमनताईंचे गुरू अब्दुल रहेमान खान यांनी सुमनताईंकडून दोन ठुमऱ्या गाऊन घेतल्या होत्या. एक मिश्र रागाचा स्पर्श असलेली 'छायी घटा घनघोर...' आणि दुसरी राग पहाडी मधील 'साजन की बात निराली...' दोन्ही ठुमऱ्यामधील त्यांचा स्वर आर्ततेने भारावून टाकतो. त्यातील त्यांच्या गायनातील कल्पकता विलक्षण होती. दोन्ही ठुमऱ्या संथ लयीच्या होत्या. त्यात ख्यालाचा भारदस्तपणा होता. ठुमरीची बढतही ख्यालासारखी होती. शिवाय बोलबनाव अप्रतिम होती. गळा ताब्यात असला, तरी आपण ठुमरी गातो आहोत म्हणून गळा फिरवण्याकडे त्यात त्यांचा कल नव्हता. माफक हरकती, मुरक्यांनी त्या त्यांनी विलक्षण केल्या. एखादा समर्थ कलाकार वैयक्तिक विचार, चिंतन, प्रतिभा आणि सादरीकरणातील सामर्थ्यातून आपले 'योगदान' कसे निर्माण करतो. त्याचे या ठुमऱ्या उत्तम उदाहरण होत्या. यात शंका नाही. सुमनताईंचा स्वरांचा अभ्यास आणि दीर्घ रियाज असल्यामुळे त्यांच्या गायनात सूक्ष्म स्वरस्थाने नेमकी लागत असत. त्याखेरीज संवेदनशीलता, सहृदयता यामुळे कोणत्याही गायन प्रकारात त्या त्या रचनेचे मूळ सौंदर्य कसे अधिक खुलवायचे हा नेमकेपणा त्यांच्याकडे होता.

सदर लेखात मला सुमनताईंची सगळी गीते विश्लेषित करणे शक्य नाही. कारण त्यांनी गायन क्षेत्रात इतके काम केले आहे की, त्याला या लेखात मला न्याय देणे शक्य नाही. इतके मोठे त्यांचे कर्तृत्व असून, त्यांना संगीत नाटक अकादमी, पद्मश्री, पद्मभूषण सारखे मानाचे पुरस्कार लाभले नाहीत; याचे खूप वाईट वाटते. त्यांच्यापेक्षा कर्तृत्वाने आणि ज्येष्ठतेने कमी असून अनेकांना मानाचे पुरस्कार मिळाले. मात्र सुमनताई कायम दुर्लक्षितच राहिल्या. त्यांच्या गुणांचे चीज झाले नाही. त्यांच्यासारख्या गुणी कलाकारांची खरी ओळख जगाला व्हावी, म्हणून मी त्यांच्या अनेक दुर्मिळ गीतांचा आढावा सदर लेखात गायकी अंगाने घेण्याचा प्रयत्न केला आहे. येत्या २८ जानेवारीस यांचा वाढदिवस आहे. वयाची ८४ पूर्ण होत आहेत. या वयात त्या अत्यंत तटस्थपणे कोणतीही, कोणाविषयी कटुता न बाळगता, आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध 'ब्र' न काढता, शांतपणे वृद्धत्व जपत एकांतवासात समाधानाने जगत आहेत, हेच खरे मोठेपणाचे लक्षण आहे.

■

**मनोज शशिकांत आचार्य**
भ्रमणध्वनी : ९०९६६८७९६३
manoj.aacharya90@gmail.com

## सुमताईंना मिळालेले पुरस्कार

❑ 'कैसे कहूँ' या हिंदी चित्रपटातील 'मनमोहन मन में...' सर्वश्रेष्ठ शास्त्रीय गीत म्हणून प्रतिष्ठित 'सुर श्रृंगार सम्मान' पुरस्कार, १९६४ ❑ १९७५ साली सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिका पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. चित्रपट होता 'रेशम की डोरी' आणि गीत अतिशय लोकप्रिय होते व आजही आहे. ते म्हणजे, 'बहनों ने भाई की कलाई से प्यार बाँधा है प्यार के दो तार से, सँसार बाँधा है...' ❑ महाराष्ट्र सरकार तर्फे प्रतिष्ठित 'लता मंगेशकर पुरस्कार' २००९ ❑ मोहम्मद रफी पुरस्कार २०११ ❑ गादिमा प्रतिष्ठान तर्फे 'गादिमा' पुरस्कार २०१७ ❑ पुल पुरस्कार २०१८ ❑ मध्यप्रदेश सरकार तर्फे प्रतिष्ठित 'लता मंगेशकर पुरस्कार' २०२०.

१९५४ ते १९८५ सालापर्यंत सातत्याने अनेक भाषांत गाणी गायल्यानंतही आजपर्यंत त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, संगीत नाटक अकादमी पुरस्कार यासारख्या मोठ्या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कारांपासून आजवरच्या सगळ्याच पक्षाच्या केंद्र सरकारने त्यांना वंचित ठेवून, त्यांची उपेक्षाच केली आहे. त्यांच्यापेक्षा वयाने आणि कर्तृत्वाने लहान गायिकांना मात्र हे राष्ट्रीय पुरस्कार मिळून काळ लोटला. पण सुमनताईंचा आजूनही विचार होत नाही, यासारखे दुर्दैव नाही.

# जगातील सर्वोत्तम शिक्षक!

**रजनीश जोशी**

**३** डिसेंबर २०२० ही तारीख रणजित डिसले यांच्यासाठीच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रासाठीच संस्मरणीय ठरली. याच दिवशी लंडनच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये अभिनेते स्टीफन फ्राय यांनी जगातील सर्वोत्तम शिक्षक (बेस्ट ग्लोबल टीचर) म्हणून रणजित डिसले यांचं नाव जाहीर केलं. युनेस्को आणि वार्की फौंडेशनतर्फे ही निवड करण्यात आली. १४० देशांतील १२ हजार शिक्षकांमधून अंतिम दहामध्ये त्यांची निवड झाली होती आणि त्या दहांमधून जगातील सर्वोत्तम शिक्षक म्हणून त्यांचा गौरव झाला. महाराष्ट्रातल्या सोलापूर जिल्ह्यामधील माढा तालुक्यातील परितेवाडी या छोट्या गावात जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून काम करणाऱ्या डिसले गुरुजींचं नाव एका रात्रीत जगभर पसरलं, गाजलं. सगळ्या देशात त्यांच्याबद्दल औत्सुक्य आणि आनंदाची भावना पसरली... जगभरात एका रात्रीत नाव झालं हे खरं असलं, तरी त्यापाठीमागं दहा वर्षांचे कष्ट होते, अभ्यास आणि ध्यास होता, संशोधन होतं... खरोखर हा प्रवास अद्‌भुतरम्य म्हणावा असाच आहे.




बार्शी तालुक्यातील साकत गावात जन्मलेले रणजित डिसले यांचं प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेतच झालं. त्यानंतर बार्शीच्या सुलाखे प्रशालेत दहावी आणि नंतर सोलापुरात. २००९ला माढा तालुक्यातील परितेवाडी शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा ते उत्साहानं रुजू झाले. पण शाळेत पोहोचले आणि त्यांच्या उत्साहावर पाणी पडलं. शाळेच्या उघड्या खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांचा पत्ताच नव्हता. काही जणांनी आपल्या शेळ्या वर्गात आणून बांधलेल्या. त्यांच्या लेंड्यांचा वास सगळीकडे पसरलेला. शाळेत नाव घातलेली मुलं गुरं राखायला रानात गेलेली. एखाद्या चित्रपटात शोभावं असं हे कथानक. डिसले गुरुजींना आपल्यापुढील आव्हानाची कल्पना आली. त्यांनी आपली दुचाकी काढली आणि मुलांचा शोध सुरू केला. रानात गेलेल्या मुलांना धरून शाळेत आणलं. त्यांच्या पालकांशी चर्चा सुरू केली. मुलांना शाळेत पाठवण्याबाबत आग्रह केला. शेतात काम करणाऱ्या आणि कष्ट हेच जीवन समजणाऱ्या पालकांना मुलांच्या शिक्षणाचं महत्त्व समजावून सांगणं ही तारेवरची कसरत होती. डिसले गुरुजींनी हार मानली नाही. मुलांना शाळेत धरून आणण्यात त्यांचे सुरुवातीचे दिवस खर्ची पडले. कशीबशी मुलं जमायला लागली, तेव्हा त्यांनी पाठ्यपुस्तक उघडलंच नाही. डिसले गुरुजींनी कटाक्षानं मुलांना लॅपटॉप, मोबाइलवरून गाणी, गोष्टी ऐकवायला, कार्टुन पाहायला लावलं. आठ महिन्यांनी त्यांनी पाठ्यपुस्तक उघडलं आणि हळूहळू मुलं शाळेत रमायला लागली.

एकाचवेळी विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना शिकण्याची, प्रबोधन करण्याची त्यांची स्वत:ची पद्धत त्यांना उपयोगी पडली. म्हणजे, पालकांकडे असलेल्या मोबाइलवर ते विद्यार्थ्यांचा घरचा अभ्यास पाठवू लागले. गाव लहान असल्यानं विद्यार्थीसंख्या कमी होती. पालकांना आपल्या मुलांनी अभ्यास करायला हवा, असं वाटायला लागलं होतं. डिसले गुरुजींनी रोज सायंकाळी सात वाजता अलार्म वाजवायला सुरुवात केली. ‘आता, टीव्ही बंद करा आणि अभ्यासाला बसा’ असा त्याचा अर्थ. पालकांच्या मोबाइलवर अभ्यास पाठवलेला असल्यानं त्यांनी विद्यार्थ्यांकडून तो करून घ्यायला सुरूवात केली. एके दिवशी, बिस्किटचा पुडा किंवा तत्सम काहीतरी आणण्यासाठी डिसले गुरुजी दुकानात गेले. तिथं त्यांनी एका बऱ्यापैकी सुशिक्षित दिसणाऱ्या ग्राहकाला ‘क्यू आर कोड’वर स्कॅन करताना पाहिलं. म्हणून त्यांनी दुकानदाराला त्याविषयीची माहिती विचारली. आणि मग त्यांच्या डोक्यात विचारचक्र फिरू लागलं. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात क्यू आर कोडचा (क्विक रिस्पॉन्स कोड) वापर कसा करता येऊ

शकेल? त्यांनी डोकं लढवलं. प्राणी, पक्षी, ज्वालामुखी, माणसाच्या शरीरातील अवयव अशा आकृत्यांचे 'क्यू आर कोड' केले. ते स्कॅन केले की, त्यांच्या मोबाइलवर चित्र उमटू लागलं. त्यातून मग विद्यार्थ्यांची समज वाढू लागली. अभ्यासाच्या सूचना, विद्यार्थ्यांनी करायची कृती, कवितेची ध्वनिफीत, गोष्टींचे व्हिडिओ, ऑनलाईन प्रश्नपत्रिका, हेल्पलाईन नंबर, मुलांचा प्रतिसाद कॅमेऱ्याद्वारे साठवणं, मुलांचा ऑनलाईन फीडबॅक अशा सगळ्या गोष्टी त्यातून साध्य होऊ लागल्या. मग हळूहळू त्यांनी थ्रीडी चित्रपट, थ्रीडी चित्रांच्या पार्श्वभूमीवर पाठ्यपुस्तकेच थ्रीडी करण्याचीही कल्पना साकारली. ती अभिनवच ठरली आहे. क्रमिक पुस्तकातील पाठावर तयार केलेला 'क्यू आर कोड' तर खूपच उपयुक्त ठरलं. त्यांच्या शाळेतल्या, त्यांच्या



वर्गापुरता मर्यादित असलेला हा प्रयोग मग पुढे माढा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सगळ्या शाळांत राबवला जाऊ लागला. त्याची दखल महाराष्ट्र सरकारनं घेतली आणि तो प्रयोग राज्यातल्या सगळ्या शाळांमध्ये सुरू झाला. पाठ्यपुस्तकात प्रत्येक पाठाच्या शेवटी 'क्यू आर कोड' छापला जाऊ लागला. मग, देशभरात सगळीकडेच डिसले गुरुजींची 'क्यू आर कोड' पद्धती वापरली जाऊ लागली. अर्थात, त्या त्या प्रदेशाप्रमाणे त्यात बदलही केले गेले. आता जगातील अकरा देशांमध्ये 'क्यू आर कोड' पद्धती शिक्षणात वापरली जात आहे.

डिसले गुरुजींच्या प्रयोगशील 'क्यू आर कोड' शिक्षण पद्धतीला मान्यता मिळाल्यानंतर, त्यांनी मग आणखीन अनेक नवे प्रयोग सुरू केले. आपल्या गावातील झाडांची संख्या किती आहे, पर्यावरण कसं आहे, याविषयी त्यांनी प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना माहिती द्यायला सुरुवात केली. गावशिवारातील झाडांची गणती कशी करायची, यासाठी त्यांनी माढा तालुक्यातील आकुंभे हे गाव निवडलं. त्यांच्या परितेवाडी गावापासून जवळच आकुंभे गाव होतं. तिथं त्यांनी आपल्या शाळेतील मुलांना नेलं. त्यांना झाडांची गणती करायला लावली. त्याचवेळी झाडांच्या बुंध्याशी सुतळी धरून वर्तुळ, व्यास, त्रिज्या शिकवल्या. वृक्षगणतीनंतर त्याखालील क्षेत्र किती ते काढलं, तेव्हा गावातील २१ टक्के क्षेत्र वृक्षाच्छादित असल्याचं लक्षात आलं. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. त्यांनी प्रत्येक झाडाला एक 'क्यू आर कोड' दिला. तो झाडाच्या बुंध्यावर फिक्स करण्यात आला. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या मोबाइल नंबरशी तो जोडला. त्यामुळं झाडावर घाव घातला किंवा ते तोडायचा कुणी प्रयत्न करायला लागलं, तर मोबाइलवर रेड सिग्नल मिळू लागला. डिसले गुरुजींच्या पर्यावरण रक्षणाच्या या प्रयत्नांची नोंद चक्क 'युनो'ने घेतली. या प्रयोगासाठी त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला. अमेरिका, रशियानेही त्यांच्या कार्याची दखल घेतली आणि त्यांना सन्मानित केलं. ही गोष्ट अर्थातच 'ग्लोबल टीचर' पुरस्कार जाहीर होण्यापूर्वीची.

आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचल्यानंतर डिसले गुरुजींनी जगातील आठ अशांत देशांचा अभ्यास केला. भारत, पाकिस्तान, इराण, इराक, इस्राईल, पॅलेस्टाईन, अमेरिका, उत्तर कोरिया यांच्यातील संघर्ष त्यांना खटकत होता. या देशांतील पाच हजार विद्यार्थ्यांची निवड करून त्यांनी 'पीस आर्मी'ची स्थापना केली. जागतिक पातळीवर अस्थिरता आणि रक्तपात झाल्याने ज्यांना फायदा होणार आहे, अशा संधिसाधू गटांचा कावेबाजपणा या 'पीस आर्मी'ने ध्यानात घेतला. हे पाच हजार विद्यार्थी विविध देशांतले आहेत, ते एकमेकांशी संवाद साधून आपापल्या देशांतील स्थितीबाबत चर्चा करतात, अन्यही माहिती घेतात. आगामी काळात हे नेटवर्क आणखी वाढवण्याचा डिसले गुरुजींचा मनसुबा आहे. हे काम अर्थातच ते अन्य देशांतील शिक्षकांच्या सहकार्याने ते करतात. बारा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानं त्यांचे जगभरात मित्र आहेत. देशपातळीवरचे सात मोठे पुरस्कार त्यांना लाभले आहेत. पुरस्कार मिळणं गौण असलं, तरी त्यामुळं जी ओळख निर्माण झाली ती महत्त्वाची आहे, असं ते मानतात.

डिसले गुरुजी आता मायक्रोसॉफ्ट, गूगल, फ्लिपग्रीड, फ्लिकर्स, ब्रिटिश कौन्सिल, नॅशनल जिओग्राफिकबरोबर काम करीत आहेत. 'व्हर्च्युअल फिल्ड ट्रिप'च्या माध्यमातून ८७ देशांमधील ३०० पेक्षा जास्त शाळांमधील मुलांशी

संवाद साधतात, त्यांना शिकवतात. 'मायक्रोसॉफ्ट'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनी डिसले गुरुजींच्या गौरवार्थ 'हिट रिफ्रेश' ही खास ध्वनिचित्रफीत तयार केली आहे. 'मायक्रोसॉफ्ट'ने अशा पद्धतीची दखल घेतलेले डिसले हे एकमेव प्राथमिक शिक्षक आहेत. वयाच्या २८व्या वर्षी त्यांना 'मायक्रोसॉफ्ट'चीदेखील फेलोशिप मिळाली.

आपल्याकडे प्राथमिक शिक्षकाला 'गुरुजी' (गुर्जी) असं म्हणायची पद्धत आहे. गावातील प्रत्येक जण त्यांना 'डिसले गुरुजी' असंच संबोधतो. गुरुजींचे वडील महादेव आणि आई पार्वती. आईचं शिक्षण नववीपर्यंतच झालेलं. त्या शेतात काम करतात. रणजित यांचे धाकटे बंधू आता इंजिनीयर झाले आहेत, तर बहीण शिक्षिका आहे. पण लहानपणी हे दोघे शेतात आईला कामासाठी मदत करीत, तेव्हा रणजित मात्र वाचन किंवा अन्य काहीतरी खेळण्यात मग्न असे. वडील महादेव यांनी रणजितला शिक्षक होण्यासाठी प्रोत्साहन दिलं. रणजित यांचा ओढा आयटी इंजिनीयर होण्याकडं होता. सात कोटी रुपयांचा पुरस्कार आपल्या मुलाला जाहीर झाला, तेव्हा पार्वतीबाईंचा ऊर अभिमानानं भरून आला. त्यांच्यासह इंग्लंड, अमेरिका, दक्षिण आफ्रिका, नायजेरिया, व्हिएतनाम, मलेशिया, इटली, ब्राझील आणि दक्षिण कोरिया या देशांतील शिक्षक या स्पर्धेत होते. सात कोटी रुपयांचं पारितोषिक जाहीर झाल्यावर, डिसले गुरूजींनी मोठ्या उदार मनानं त्यातील निम्मी रक्कम उरलेल्या नऊ देशातील आपल्या स्पर्धक शिक्षकांमध्ये वाटून टाकली. रणजित यांच्या या औदार्याचं मूळ त्यांच्या मातोश्रीतच आहे. कारण पार्वतीबाईंना जेव्हा साडेतीन कोटी रुपये रणजितनं वाटून टाकल्याचं सांगण्यात आलं, तेव्हा त्या म्हणाल्या, ''त्यानं उरलेले पैसेही त्याच्या संशोधनासाठीच खर्च करावेत, ते कमी पडले तर आम्ही त्याला आमच्याकडे आहेत तेवढे पैसे देऊ.'' रणजित यांच्यावरील उच्च संस्काराचा हा एक नमुनाच म्हणावा लागेल.

मिळालेल्या पुरस्कारातील निम्मी रक्कम वाटून टाकल्याची माहिती सगळ्यांनाच वृत्तपत्रं आणि टीव्हीवरून समजली. रणजित सांगतात,''माझ्या शेअरिंग ऑफ प्राईजची कल्पना लोकांना खूप आवडली. इतकी, की मी एखाद्या दुकानात काही आणायला गेलो, एखादी वस्तू खरेदी केली तर जे मला ओळखतात ते माझ्याकडून पैसे घेत नाहीत. म्हणतात, तुम्ही कोट्यवधी रूपये वाटून टाकले. तुमच्याकडून आम्ही पैसे कसे घेणार..?''

भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक अनुकूल बदल घडायला हवेत, असं डिसले गुरुजींना वाटतं. ते सांगतात, ''परदेशामध्ये १८ ते २० विद्यार्थ्यांमागं एक शिक्षक असतो. आपल्याकडं ५० ते ६० विद्यार्थ्यांमागं एक. त्यासाठी अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर वाढवायला हवा. शिक्षकांना शिकवण्याचं स्वातंत्र्य द्यायला हवं. आपल्याकडं ग्रामीण भागात मुलींचे लहान वयातच विवाह होतात. त्यांनी शिकलं पाहिजे, असं कुणालाच वाटत नाही. मी स्वतः त्यासाठी प्रयत्न केले. मागासवर्गीय मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिलं. त्यांच्या पालकांशी संवाद साधून त्यांना विनंती केली. त्याचा फायदा झाला. काही प्रमाणात बालविवाहदेखील कमी झाले. पण वर्गातील शिक्षणापेक्षा हे वेगळं आहे. त्यासाठीही शिक्षकांनी प्रयत्न करायला हवेत.''



वार्की फौंडेशनच्या सात कोटी रुपयांच्या पुरस्कारानं डिसले गुरुजींचं जीवन बदलून गेलं आहे. आधी वर्गात अध्यापन करणारे गुरुजी आता शैक्षणिक धोरण ठरवण्यात आपला सहभाग देऊ लागले. आंतरराष्ट्रीय स्तरावर कामाची संधी मिळाल्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण खात्याने त्यांच्या कौशल्याचा वापर करून घ्यायला सुरुवात केली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांना खास निमंत्रित करून त्यांचा सत्कार केला. त्यांच्या कल्पनांची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्याची चक्क विनंती केली. आता डिसले गुरुजी राज्य सरकारसाठी कौशल्यविकासाचा एक प्रकल्प राबवत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलाकौशल्याला चांगली संधी देऊन त्यांचा विकास करायचा. त्यासाठी 'इनोव्हेशन इन एज्युकेशन' ही योजना आखली आहे. मुलांमध्ये असलेली कौशल्ये हेरून त्यानुसार त्यांच्या करियरची जडणघडण व्हावी, यासाठी हा प्रयत्न आहे. त्यांच्या कौशल्याचं रूपांतर 'स्टार्टअप स्कूल'मध्ये करण्याचं काम ते करत आहेत. 'स्टार्टअप स्कूल' तयार झाली तर

आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये प्रचंडच बदल होईल. बेरोजगार निर्माण करणारं शिक्षण असा शिक्का नाहीसा होईल. जीवनसन्मुख करणारं, आपल्यातील कौशल्याला वाव देणारं शिक्षण असा फरक विद्यार्थ्यांचं जीवनमान उंचावेल.

पुरस्कारानंतर डिसले गुरुजींच्या जीवनात चांगले बदल झाले. पण त्याहीपेक्षा जिल्हा परिषद शिक्षकांकडे पाहण्याचा समाजाचा, सरकारचा, शिक्षण खात्याचा दृष्टिकोन बदलला हे महत्त्वाचं आहे. स्वतः डिसले गुरुजीही तसं मानतात. जिल्हा परिषद शाळांचा पट तर वाढलाच, पण शिक्षकांच्या कामाला आदर मिळू लागला. समाजातील त्यांचा आदर वाढला. राज्यकर्ते, समाज आणि नागरिकांच्या नजरेत शिक्षकांबद्दलची प्रतिष्ठा दिसू लागली.

परवाच, अमिताभ बच्चन यांच्या 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमात 'एक्सपर्ट' म्हणून डिसले गुरुजींना आमंत्रित करण्यात आलं होतं. शिक्षण विभागाच्या विविध बैठकांमध्येही त्यांना निमंत्रण दिलं जातं. त्यांच्या अनुभवाचा आणि व्यासंगाचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला जातो. डिसले गुरुजींना राज्यपाल नियुक्त आमदारपद देण्याबाबत चर्चा होत होती, तेव्हा 'आपण शिक्षण क्षेत्रातच काम करणार आहोत, अन्य कोणत्याही क्षेत्रात जाणार नाही,' असं त्यांनी निक्षून सांगितलं.

'ग्लोबल टीचर' झाल्यामुळे सगळीकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असताना, काही नतद्रष्टांनी त्यांच्या यशाला गालबोट लावण्याचा अयशस्वी प्रयत्नही केला. भारतीय शैक्षणिक बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी हा ग्लोबल पुरस्कार त्यांना देण्यात आल्याची भूमिका मुद्दाम उठवण्यात आली होती. त्यावर डिसले गुरुजी म्हणतात, ''माझा सात कोटींचा पुरस्कार कुठे आणि अब्जावधी रुपयांची भारतीय शैक्षणिक बाजारपेठ कुठे? सात कोटींनी असा काय फरक पडणार आहे? शिवाय मला व्यक्तिगत हा पुरस्कार नाही, माझ्या कामाला आहे. शिक्षणाची बाजारपेठ खूप मोठी आहे. त्यात घुसण्यासाठी मला पुरस्कार मिळाला, असं म्हणणं हास्यास्पद आहे.''

'क्यू आर कोड'च्या वापराबद्दलही काहीजणांनी नापसंती व्यक्त केली होती. प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मानसिक आणि आकलनाची जडणघडण ज्या वयात होत असते, त्या काळात 'क्यू आर कोड'मधून एकच चित्र सर्वांना दाखवलं जाणार. त्यामुळं त्यांच्या कल्पनाविलासावर मर्यादा येतील, असाही आक्षेप होता. रणजित त्याविषयी सांगतात, ''प्राणी-पक्षी हा वेगळा मुद्दा आहे. ज्वालामुखी तुम्ही कसा दाखवणार? किंवा पोटातील जठर किंवा तत्सम अवयव कसे दाखवणार? तशा पद्धतीच्या अभ्यासासाठी क्यू आर कोड उपयुक्त आहे. ते अंतिम नाही, याची मला जाणीव आहे आणि माझा तसा दावाही नाही.'' एकीकडे जागतिक बँकेकडून शिक्षण सल्लागार म्हणून डिसले गुरुजींची निवड केली जाते आणि दुसरीकडं त्यांच्यावर असे हेत्वारोप केले जातात... अर्थात समाजात दोन्ही प्रवृत्तींचे लोक असतात, असं म्हणून रणजित त्याला उत्तर देत बसत नाहीत. त्यात वेळ नको घालवायला, असा विचार करतात.

सगळं जग आता कोरोनानं ग्रासलं आहे. अनेक देशांमध्ये संघर्ष पेटला आहे. अनेक देश धुमसत आहेत. अशा काळात विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देणं हीच एक परीक्षा आहे. डिसले सांगतात, ''२०३० पर्यंत जगभरातील जास्तीत जास्त शाळांना जोडून घेण्याचा 'युनेस्को'चा प्रयत्न आहे. अनेक देश यात जोडले जातील. आम्ही विविध देशांत 'पीस कॅम्प' करू. ग्राऊंड लेव्हलवर जाऊन आम्हाला काम करायचं आहे. भारतातही आमच्या अनुभवाचा फायदा शाळांना झाला पाहिजे, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. सरकारी शाळांचं चित्र बदललं पाहिजे, हा आमचा ध्यास आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आमच्यापाशी तशी इच्छा व्यक्त केली आहे. एकाचवेळी राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आमचं काम सुरू आहे. जगातलं वातावरण कसंही असलं तरी भविष्य उज्ज्वल आहे, यात शंका नाही.''

रणजित डिसले यांच्या नावे आज इटलीमध्ये 'कार्लो मझोने-रणजित डिसले स्कॉलरशिप' दिली जाते. ४०० युरो एवढी तिची रक्कम आहे. आय टी इंजिनीयर होण्याची इच्छा असलेल्या रणजित डिसले यांनी संपूर्ण शिक्षण क्षेत्रच 'आयटी' तंत्रज्ञानावर आणण्यासाठी कंबर कसली आहे. ग्रामीण भागातील छोट्या खेड्यात प्राथमिक शाळेत काम करणारा एक शिक्षक आपल्या प्रतिभा आणि कर्तृत्वाच्या जोरावर जगावर राज्य करू शकतो, त्याचं रणजित डिसले हे उदाहरण आहे. अगदीच अतिशयोक्ती नाही, पण साने गुरुजींनंतर डिसले गुरुजी हे नाव सगळ्यांच्या लक्षात कायमचं राहिल, नाही का?

■

**रजनीश जोशी**
२, सुंदर काँप्लेक्स, होटगी रोड,
गैबीपीर दर्ग्याजवळ, सोलापूर- ४१३००३
मोबाईल : ९८५००६४०६६

# नदीजोड प्रकल्पाने देशाचे चित्र बदलेल

**दिलीप चावरे**

**कौ**णत्याही प्रश्नाचा चुथडा करून त्याचे भिजत घोंगडे वर्षानुवर्षे वागवत राहण्याचा अनुभव भारताच्या सर्व भागात सातत्याने येत असतो. मुंबईसारख्या प्रमुख रस्त्यांची न चुकता सालोसाल होणारी चाळण, अनेक भाग पावसाळ्यात पाण्याखाली जाणे किंवा ठिकठिकाणचे नाले-त्यांच्या सफाईवर करोडो रुपये खर्च करूनही-ओसंडून वाहते राहणे हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. हीच परिस्थिती संपूर्ण देश दरवर्षी अनुभवत असतो. याचे एक प्रमुख कारण म्हणजे आकाशातून पडणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन नसणे.

इस्त्रायलसारख्या वाळवंटी देशात नंदनवन फुलू शकते. या चिमुकल्या इस्रायलला दरवर्षी भेट देणारे आपले शेकडो लोकप्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी नर्मदेतील गोट्यासारखे कोरडे पाषाण होऊन परत येतात आणि पाण्याचा अतिवापर किंवा अयोग्य प्रकारे वापर चालूच राहतो. तो जपून केला नाही तर २०५० साली स्थिती बिकट होईल हा अंदाज वर्तवण्यासाठी कोणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. या समस्येचे मूळ आणि त्यावरील उपाय सगळ्यांना ठाऊक आहे. तो म्हणजे देशभर नदीजोड प्रकल्प राबवणे. मात्र राजकीय चढाओढीच्या हव्यासापायी त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले आहे. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना यादृष्टीने पहिला भरीव प्रयत्न झाला. पण हा होता एक अपवाद. सुरेश प्रभू यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेला नदीजोड प्रकल्प पुढे अडचणीतच आणण्यात आला. आता कोठे आशेचा किरण दिसू लागला आहे.

नदीजोड प्रकल्पाचा विचार किमान शतकभर जुना आहे. त्याद्वारे अनेक योजना कार्यान्वित करण्याच्या हालचाली विचाराधीन होत्या. दक्षिण भारतामधील नद्या जोडून त्यामधून जलवाहतूक सुरू करावी या हेतूने ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दिलेल्या मूळ योजनेनुसार १९७२ साली तत्कालीन केंद्रीय मंत्री के. एल. राव यांनी गंगा-कावेरी नद्यांची जोडणी करावी असा प्रस्ताव मांडला. उत्तरेतील अतिरिक्त पाणी टंचाईग्रस्त दक्षिण भारतात वळवण्यासाठी राव यांनी हा प्रस्ताव मांडला होता. गंगा नदीचे ६० हजार क्युसेक पाणी बिहारमधील पटना शहराच्या जवळ वळवून सोन, नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा आणि पेन्ना नदीमार्गे कावेरीत नेण्याची योजना मांडली होती. या संपूर्ण प्रकल्पाची लांबी २६४० किलोमीटर असणार होती. सुमारे १५० दिवसांत गंगेचे पाणी कावेरी नदीत पोहोचेल असा अंदाज राव यांनी व्यक्त केला होता. त्यानंतर केंद्र सरकारने राव यांच्या प्रस्तावावर अभ्यास करण्यासाठी एका समितीची स्थापना केली. पण गाडे तेथेच अडले. अटल बिहारी वाजपेयी यांनी नदीजोड प्रकल्पाला गती देण्याचा प्रयत्न केला. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने हा प्रकल्प पुन्हा एकदा घेतला आहे. त्याचा संक्षिप्त तपशील या लेखात आढळेल.



महापूर, अवर्षण आणि ग्रामीण-नागरी स्थलांतर या विषयी देशात अनेक अभ्यास करण्यात आले आहेत. याचा पुनरुच्चार करणे गरजेचे नाही. तथापि एखादा दाखला देणे उद्बोधक ठरावे. केंद्रीय जल आयोगाच्या १९५२ ते २०१८ दरम्यानच्या अभ्यासानुसार या ६७ वर्षांमध्ये देशात महापूर आले नाहीत असे एकही वर्ष नव्हते. या महापुरांचा अभ्यास केल्यास असे आढळते, की या काळात १०,९४२ लोक पुरांमध्ये मरण पावले, २६ कोटी हेक्टर जमिनीवरील पीक पाण्यात गेले आणि ८२ लाख घरांची पडझड झाली किंवा ती वाहून गेली. आर्थिक नुकसान चार लाख ७० हजार कोटी रुपयांचे झाले. ही आकडेवारी अतिरंजित वाटल्यास २०१८ साली उपलब्ध झालेल्या आकड्यांवरून त्याची सत्यता लक्षात येईल. आयोगाच्या पाहणीनुसार २०१८ या एका वर्षात महापुरांमुळे देशात झालेली हानी ९५७३६ कोटी रुपये म्हणजेच २०१७ सालापेक्षा अडीच पटीने जास्त होती. जलशक्ती राज्यमंत्री रतनलाल कटारिया यांनी राज्यसभेत हा तपशील दिला. तज्ज्ञांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार यापुढील

काळात किनारी भागातील पुरामुळे दरवर्षी ३५ लाख लोकांच्या जीविताला धोका निर्माण होणार आहे. तज्ज्ञांनी केलेले दुसरे महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे पूर येणे आधीप्रमाणेच दरवर्षीचे असले तरी आजकाल पुराचे पाणी जास्त काळ आणि जास्त क्षेत्रावर साचून राहते. योग्य उपाय न योजल्यास हे नुकसान वाढत जाणार आहे.

सुदैवाने आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाला नवीन जीवनदान मिळत आहे. त्यानुसार देशातील साठ प्रमुख नद्या जोडणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पात गंगेचाही समावेश आहे. पहिला हिमालयीन क्षेत्र, दुसरा दक्षिण भारत आणि तिसरा आंतरराज्य नदीजोड असे या प्रकल्पाचे तीन भाग आहेत. त्यायोगे सुमारे १५,००० किलोमीटर लांब नदीपात्रांचा विकास करण्यात येणार आहे. एकंदर १०,००० किलोमीटर जलमार्ग निर्माण



करण्यात येणार असून ३,००० पर्यटन केंद्रे विकसित करण्यात येतील. यातून जीवित रक्षण होण्याबरोबरच अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल, कारण मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल. तसेच दरवर्षी येणाऱ्या अवर्षणाच्या तडाख्यापासून देशाचा बचाव होऊ शकेल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही

नेमेची येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा!

आमच्या लहानपणी ही कविता अभ्यासक्रमात असे. नंतरच्या काळात पूर आणि दुष्काळ यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि हानी यांचे भान आल्यानंतर त्यातील कौतुकाचा भाग संपून या प्रश्नाचा विचार सुरू झाला. लवकरच स्पष्ट झाले, की आपल्या देदीप्यमान राष्ट्रीय परंपरेला साजेसेच आपल्या सरकारचे वर्तन दीर्घकाळ राहिले आहे. परिणामी पूर, दुष्काळ आणि आनुषंगिक समस्या यांचे चक्र आपला देश दरवर्षी अनुभवतो, ते नष्ट करण्याचा निर्धार दर पावसाळ्यात करतो आणि लगेच विसरूनही जातो.

देशाच्या एकूण पाणी उपलब्धतेचा आढावा घेता असे दिसते की, सुमारे ७० टक्के पाणी देशाच्या ३५ टक्के जमिनीला उपलब्ध होते. तथापि पाण्याची मागणी सतत वाढत आहे. एक अनुमान असे आहे, की नजीकच्या भविष्यात भारतातील उपलब्ध पाणी पुरवठा मागणीच्या जेमतेम निम्मा म्हणजे केवळ ५० टक्के असेल. यावरून पाणी प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित होते.

त्या पार्श्वभूमीवर यंदा महाराष्ट्रातले चित्र बोलके ठरावे. राज्यात जुलै महिन्यात सर्वाधिक पाऊस पडला. तो गेल्या ४० वर्षांतील विक्रमी पाऊस होता. परंतु संपूर्ण महाराष्ट्रातच गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात पूर येण्यास हवामानबदल कारणीभूत होते. देशाचा विचार करता असे दिसते की, संपूर्ण भारतभर अतिवृष्टीच्या घटना तीन पटीने वाढल्या आहेत. साहजिकच सर्वत्र महापूर आल्याच्या बातम्या आपण पाहिल्या आहेत.

या पावसाळ्यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर हे जिल्हे सर्वाधिक प्रभावित झाले. या जिल्ह्यांमध्ये १,००० पेक्षा जास्त गावे बाधित झाली, तर जवळपास चार लाख लोकांना घर सोडावे लागले. प्राथमिक अंदाज असा आहे की, पुरामध्ये दोन लाख हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरील पिकाचे नुकसान झाले आहे. विविध पायाभूत सुविधांनाही पुराचा जोरदार फटका बसला. शेकडो पूल पाण्याखाली गेले, हजारो गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना ठप्प झाल्या आणि किमान दहा लाख ग्राहकांचा वीजपुरवठा प्रभावित झाला.

केंद्र सरकारने २७ जुलै २०२१ रोजी ७०० कोटी रुपयांची अंतरिम मदत जाहीर केली. ती अपुरी असल्याची तक्रार राज्य शासनाने केली. एकंदरीत सालाबादप्रमाणे सारे काही यथासांग पार पडले आणि राजकीय चिखलफेक सुरू झाली. मूळ प्रश्न आहे तेथेच राहिला. गेल्या १५ वर्षांतील ही अशी तिसरी भीषण आपत्ती. परंतु तिच्यावर कायमस्वरूपी मात करण्याच्या दिशेने झालेली प्रगती शून्य.

केंद्र सरकारच्या एका अहवालानुसार जलस्रोत व्यवस्थापनात दक्षिणेतील राज्यांच्या क्रमवारीत केरळ शेवटी आहे. हिमालयाच्या क्षेत्राबाहेरील राज्यांत जलव्यवस्थापनात केरळ बाराव्या क्रमांकावर आहे. गुजरात, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश यांची कामगिरी केरळपेक्षा सरस आहे. हा अहवाल प्रसिद्ध होतो न होतो, तेवढ्यात केरळ शासनाने त्याच्या निष्कर्षावर शिक्कामोर्तब करून दाखवले. केरळमधील महापूर त्याचा पुरावा ठरला. त्या राज्यातील धरणांमधून पाणी योजनाबद्ध प्रकारे सोडले गेले असते तर पूरस्थिती इतकी बिघडली नसती.

अधिकारी आणि तज्ज्ञ यांनी दिलेल्या माहितीनुसार

यंदा नद्यांना पूर आला तेव्हा केरळमधील विविध धरणांमधून पाणी विसर्ग सुरू करण्यात आला. पावसामुळे सर्व धरणे भरली होती. त्यांचे पाणी एकाच वेळी सोडण्यात येऊ लागल्याने अनेक शहरे आणि खेडी तसेच रस्ते, घरे आणि दुकाने पाण्याखाली गेली. पावसाचा तडाखा आणि वादळी वारे यांच्यामुळे हजारो कच्च्या आणि पक्क्या घरांचेही प्रचंड नुकसान झाले. भारताच्या इतर राज्यांवरही तलवार टांगती असून नैसर्गिक आपत्तीमुळे भारताला अशा संकटांना सामोरे जावे लागणार आहे. एकीकडे ही समस्या तर दुसरीकडे राष्ट्रीय आपत्ती-व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेला इशारा जरूर धक्कादायक वाटू शकतो. पूर, अतिवृष्टी आणि भूस्खलन यांच्यामुळे आगामी दशकात अंदाजे १६००० बळी जातील तर ५०००० कोटी रुपयांपेक्षा अधिक आर्थिक नुकसान होईल; परंतु भारताकडे उपग्रह आणि पूर्वसूचना देणारी यंत्रणा असल्यामुळे या आपत्तीस काही प्रमाणात आळा घालता येऊ शकेल असा किंचितसा दिलासाही प्राधिकरणाने दिला आहे.

याची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासारखी आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने देशातील ६४० जिल्ह्यांमधील आपत्ती-व्यवस्थापनाबाबत एक अभ्यास केला. त्या आधारे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये संभाव्य आपत्तीची तीव्रता, होऊ शकणारे नुकसान, जीवितहानी यांचा तपशील जमा करण्यात आला. अपेक्षेनुसार त्याचा निष्कर्ष असा आहे की, बहुतांश राज्यांनी संभाव्य आपत्तीचे गांभीर्य आणि त्यापासूनचे संरक्षण याबाबत कोणतीही तयारी केलेली नाही. अहवालात म्हटले आहे, की नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी आपण अगदीच मागासलेले आहोत. आपल्याला आधुनिक साधनसामग्री आणि अस्तित्वात असणाऱ्या यंत्रणांची सुधारणा आवश्यक आहे. बहुतेक राज्यांमध्ये पूर आणि भूस्खलनासारख्या घटनांवर योग्य दीर्घकालीन उपाययोजना केल्या जात नाहीत. या विषयी राज्यांनी केलेले सर्वेक्षण हे फारच जुजबी असून हिमाचल प्रदेशचा अपवाद सोडल्यास कोणत्याही राज्याने विस्तृत मूल्यांकन केलेले नाही.

नेमकी हीच बाब लक्षात घेऊन देशातील विविध नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती किंवा आपत्तीसदृश संकटांना तोंड देता यावे आणि अशा प्रसंगी तातडीने बचावकार्य सुरू होण्यासह बाधित लोकांचे पुनर्वसन व्हावे या व्यापक हेतूने केंद्र सरकारने आपत्ती व्यवस्थापन कायदा केला. त्यानुसारच राष्ट्रीय आपत्ती-व्यवस्थापन प्राधिकरण स्थापण्यात आले असून पंतप्रधान या प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. 'सज्ज समाज, सुरक्षित समाज' असे या प्राधिकरणाचे बोधवाक्य आहे. प्राधिकरणाने एक राष्ट्रीय आपत्ती-व्यवस्थापन आराखडा तयार केला आणि राष्ट्रीय आपत्ती- व्यवस्थापन संस्थाही उभी केली. देशभरातील सर्व राज्ये आणि शासकीय संस्थांना आपत्ती व्यवस्थापनाच्या उपाययोजनांविषयी आवश्यक सहकार्य देणे अथवा प्रशिक्षण देणे इत्यादी कामे संस्था पार पाडत आहे. देशभरात आपत्तीस्थळी मदतीसाठी तातडीने पोहोचणाऱ्या जवानांची कामगिरी आपण पाहिली आहे. हे दल स्थापन करणे हा याच कायद्याचा एक भाग आहे. म्हणूनच येणारे धोके ओळखून खबरदारी घेणे आणि जरूर ती उपाययोजना करणे गरजचे असते. केरळमध्ये आलेला अनुभव कोणत्याही राज्यात येऊ शकतो. वेळीच प्रतिबंधक उपाय करणे अनिवार्य आहे. आपत्ती-व्यवस्थापन यंत्रणा बळकट करणे, ही काळाची गरज आहे.

पाणी प्रश्न आणि आपण गेली ७५ वर्षे एकत्र नांदत आहोत. यावर अखंड चर्चा होत असते. या देशाची



भौगोलिक परिस्थिती पाहता आपला पाणी प्रश्न म्हणजे प्रामुख्याने पाणीटंचाई. ही टंचाई बिलकूल नैसर्गिक नाही. आपला पाणी प्रश्न निर्माण होतो याचे खरे कारण अपुरा पाऊस हे नसून आपला सदोष दृष्टिकोन हे आहे. बहुतेक दर वर्षी जेवढा पाऊस आपल्या देशात पडतो तेवढा आपली गरज पूर्ण करण्यासाठी पुरेसा असतो. आपली खरी समस्या पाणी- नियोजनाची आहे. सुमारे हजार लहान-मोठी धरणे आपल्याकडे आहेत. परंतु त्यात जमा होणारे अतिरिक्त पाणी समुद्रात वाहून जाते तर उरलेले वर्षभर पुरेल इतके नसते. त्यामुळे देशाच्या अनेक भागांत दर वर्षाचे चार महिने दुष्काळाचे चटके बसतात.

अधिकृत आकडेवारीनुसार देशातील सुमारे ७० टक्के भाग अवर्षणग्रस्त आहे. तो प्रामुख्याने दक्षिण आणि पश्चिम भारतात आहे. उलट उत्तर-पूर्वेत दरवर्षी महापूर येतात. इतका पाऊस पडतो की, नद्यांच्या पुरात पूर्ण गावे वाहून जातात. एकीकडे ७० टक्के जमीन पाण्यावाचून आहे, तर दुसरीकडे लाखो एकर जमीन अतिपाण्याने नापिक झाली

आहे. याचे कारण म्हणजे पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसणे. पाऊस पडतो आणि पाणी वाहून जाते. हे का घडते? आपण याचेही उत्तर जाणतो. आपण पाणी साठवत नाही. पुराचे पाणी नदीवाटे समुद्रात वाहून जाते. धरणांच्या मर्यादित क्षमतेमुळे बरेचसे पाणी सोडून द्यावे लागते. दिवाळी संपली, की त्याचे परिणाम दिसू लागतात कारण निम्म्याहून अधिक पाणी समुद्रात जाऊ दिलेले असते.

उपलब्ध पाण्याचाही योग्य वापर होत नाही. पाणीगळती ही आपली राष्ट्रीय समस्या झाली आहे. आपण बरेसचे पाणी सहज वाया घालवतो. जे पाणी लोकांपर्यंत पोहचते त्याचीही नासाडी होते. टँकर माफिया ही नवीन जमात गेल्या काही वर्षांत फोफावली आहे. खंडणी गुन्हेगारीचे हे दुसरे रूप आहे. मुंबईसारख्या शहरातही ती आढळून येते.

पाणी प्रश्न किती गंभीर आहे आणि त्यावर मात करण्याचा उपायही कोणता हेही आपण जाणतो. त्याचा उल्लेख आधी येऊन गेलेला आहे. या योजनेचे सर्वपरिचित नाव आहे राष्ट्रीय नदीजोड प्रकल्प. त्याची गरज आणि उपयुक्तता सर्वांना मान्य आहे. तरीसुद्धा त्याकडे कोणत्याच सरकारने लक्ष दिलेले नव्हते. अपवाद पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा. सर्वोच्च न्यायालयाने तेव्हा हा प्रकल्प सुरू करा असा आदेश दिला होता आणि वाजपेयी यांनी त्यावर अंमल केला. परंतु त्याआधी आणि नंतरही त्याकडे दुर्लक्षच झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास नवे करोडो एकर क्षेत्र लागवडीखाली येऊ शकेल.

या पार्श्वभूमीवर महापूर आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्र हा सर्वपक्षीय संकल्प नेहमी ऐकू येतो. त्यात नदीजोड प्रकल्पावर विशेष भर देण्यात आला आहे. कोकणातले पाणी गोदावरीच्या खोऱ्यात नेणे, समुद्रामध्ये वाहून जाणारे पाणी अडवून कालव्यातून दुष्काळग्रस्त भागांमध्ये नेणे आणि मराठवाडा जलसंचय प्रकल्पाला चालना देणे हे यातील प्रमुख मुद्दे आहेत.

मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी ११ प्रमुख धरणांची एक शृंखला (ग्रीड) तयार करून, त्यांना पाईपने जोडण्याची योजना आहे. पाईपच्या माध्यमातूनच पिण्याचे आणि सिंचनाचे पाणी पोहोचवायचे आहे. समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणले गेले तर सुमारे १०० टीएमसी पाणी मराठवाड्यात येऊ शकते. त्यामुळे मराठवाड्याचा दुष्काळ संपेल असे हे गुलाबी स्वप्न आहे. ते गेली ५० वर्षे जनतेला सतत दाखवण्यात येत आहे. दरम्यान पावसाची अनियमितता आणि त्यातील खंड यामुळे सतत गंभीर परिस्थिती निर्माण होऊन त्याचा मोठा दुष्परिणाम कृषी क्षेत्रावर होत आहे. परिणामी नागरी भागाकडे स्थलांतर वाढत आहे.

महाराष्ट्राला दुष्काळ नवीन नाही. राज्यात १८७१ सालापासून आजवर २३ दुष्काळ पडले आहेत. गेल्या काही काळात १९७२ आणि १९८७ चे दुष्काळ अधिक भीषण होते. हा विचार केला तर दुष्काळ ही आपत्ती समजण्यापेक्षा त्यास योग्य व्यवस्थापनाचे आव्हान म्हटले पाहिजे. दुष्काळावर केवळ चर्चा न करता त्याचा मुकाबला करण्यावर भर देण्याचे धोरण असले पाहिजे.

म्हणूनच महाराष्ट्राने नदीजोड प्रकल्पाचा योग्य लाभ घेणे आवश्यक आहे. सुधारित नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देशात ५६ दशलक्ष एकर परिसर सिंचनाखाली येईल. हे क्षेत्र सध्याच्या सिंचन क्षेत्राच्या जवळपास ३३ टक्के इतके आहे. या प्रकल्पातून ३४००० मेगावॅट वीज निर्माण होऊ शकते. एकीकडे महापूर तर दुसरीकडे दुष्काळ अशा दुहेरी अस्मानी संकटाचा सामना महाराष्ट्राने सातत्याने केला आहे. या परस्पर भिन्न भौगोलिक रचना आणि निसर्ग यांची सांगड घालून पुरामुळे वाया जाणारे पाणी गरजेच्या ठिकाणी वळवण्यासोबतच पाणी साठवणक्षमता वाढवणे, शेतकऱ्यांना अधिकाधिक सक्षमता देणे अशा अनेक उपाययोजना नदी-जोड प्रकल्पातून राबवता येतील. तसेच नदीजोड प्रकल्प राबवताना त्यातले अडथळे, पुनर्वसन आणि नैसर्गिक साधन-संपत्तीचे जतन या बाबींकडेही लक्ष देण्याची आवश्यकता वाटते आहे. नदी जोड प्रकल्पामुळे जे विस्थापित होणार आहेत, त्यांचे विस्थापन करताना त्यांच्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतानाच त्यांच्या रोजगार, शिक्षणाचेही प्रश्न सरकारने तातडीने सोडवावेत, ही अपेक्षा राहीलच. निसर्गाची रचना ही साधी दिसत असली तरी अतिशय गुंतागुतीची आहे. प्रत्येक नदीला स्वत:ची परिसंस्था असते. त्यामधील जलचर वेगळे असतात. पाण्याचा गुणधर्म, त्यातील खनिजे वेगळी असतात. एक नदी दुसरीला जोडताना विविध घटकांवर होणाऱ्या परिणांमाचाही सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

दुष्काळग्रस्त भागात पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबाचा वापर करून भूजल पातळीत वाढ करणे आपल्या जल-संस्कृतीचा भाग बनणे अगत्याचे आहे. देशात अनेक स्थानिक आणि वैयक्तिक छोट्या प्रकल्पांमधून हे सिद्ध झाले आहे. असे प्रकल्प सर्वत्र राबवून आणि त्यांचा सरकारी पातळीवर प्रचार आणि प्रसार करून शेती, पर्यावरण आणि पाणी यांचा योग्य वापर करणे, हाच खरा शाश्वत विकास आहे. केवळ पोकळ आश्वासनांची खैरात न करता ज्याच्या जीवावर देश चालतो, तो बळकट, तर देश सक्षम. दुष्काळग्रस्त शेतकरी-वर्गासाठी केलेला संकल्प सकळांसाठी लाभदायी ठरावा ही अपेक्षा.

■

**– दिलीप चावरे**

# 'पाणवठा' अपंग प्राण्यांचे अनाथाश्रम

## जनार्दन जोशी

**श्री.** गणराज जैन व डॉ. अर्चना जैन हे गेली अनेक वर्षे जखमी व अनाथ प्राण्यांसाठी निष्ठेने काम करीत आहेत. हे दोघेही 'पाणवठा फाऊंडेशन' या संस्थेचे संचालक आहेत. आज आपण पाहतो की, 'मतिमंद मुलांसाठी' तसेच वृद्धांसाठी, गरीब कुटुंबासाठी, आदिवासी जमाती, लहानसहान शेतकरी यांच्यासाठी विविध संस्था सामाजिक बांधिलकी म्हणून काम करत आहेत.

पण, पर्यावरण रक्षणाच्या दृष्टिकोनातून जखमी,अनाथ पक्ष्यांची व प्राण्यांची दखल तितक्या मोठ्या प्रमाणात घेतली जात नाही. मात्र गणराज व डॉ. अर्चना या दोघांनी नेमका हाच दृष्टिकोन ठेऊन अनाथ-अपंग पक्ष्यांप्राण्यांसाठी निवाऱ्याची आणि देखभालीची सेवा करण्याचे व्रत घेतले आहे. हा एक स्तुत्य असाच उपक्रम आहे हे निश्चित.



आजपर्यंत या दोन व्यक्तींनी उपचार केंद्राच्या माध्यमांतून 'बदलापूर' येथील चामटोली गावात सुमारे पन्नास गुंठे जमिनीवर पक्ष्यांप्राण्यांवर उपचार केले जात आहेत. आत्तापर्यंत सुमारे ४,५०० पेक्षा पक्ष्यांप्राण्यांवर उपचार झाले आहेत. तसेच भारतीय गोवंश संवर्धनाच्या हेतूने स्थापन केलेल्या'सावली गोशाळा' या उपक्रमाच्या माध्यमांतून सुमारे १७० गायी गरजू शेतकऱ्यांना मोफत दिल्या आहेत. या दोनच उपक्रमांपुरते मर्यादित न राहता, त्याही पुढे एक पाऊल टाकत या उभयतांनी 'कायमस्वरूपी' अपंग होणाऱ्या, पक्ष्यांप्राण्यांसाठी निवाऱ्याची सोय व्हावी, यासाठी 'पाणवठा' शीर्षकाने भारतातील पहिले अपंग पक्ष्यांप्राण्यांचे अनाथाश्रम स्थापन केले आहे. अनेकदा पक्ष्यांप्राण्यांवर दीर्घकाळ चालणारे उपचार पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या मदतीने करावे लागतात. त्यासाठी आर्थिक खर्च बराच होतो. तरीही या उभयतांचे सेवाकार्य चालूच असते. या संपूर्ण सेवाकार्यासाठी त्यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

गेली अनेक वर्षे हा प्रवास सुकरपणे चालू होता. पण २०१९ मधील जुलै महिन्यातील २६ व २७ रोजी झालेल्या अति वृष्टीमुळे बदलापूरमध्ये आलेल्या भीषण महापुरात 'पाणवठा' आश्रमाला सर्वात मोठा फटका बसला. मुसळधार पावसाने व पुरामुळे पक्ष्यांप्राण्यांसाठी असणाऱ्या शेड्स, पिंजरे व इतर पायाभूत सुविधांचे प्रचंड नुकसान झाले. तसेच आश्रमातील दहा प्राण्यांना आपले प्राण गमवावे लागले व हा अत्यंत हृदय हेलावणारा प्रसंग होता. तरीही सेवाकार्य अखंडपणे चालूच आहे.

अशा वेळी आर्थिक मदत मिळणे क्रमप्राप्त होते. समाजातील काही धनवान लोकांनी आश्रम पुन्हा उभा राहावा व प्राण्यांची सोय व्हावी, म्हणून बहुमोल आर्थिक मदत केली. अजूनही आम्ही सर्व कार्यकर्ते आर्थिक साहाय्य कसे मिळवता येईल व अपंग प्राण्यांची सोय कशी करता येईल हे कसोशीने पाहत आहोत.

हळूहळू संस्थेची आर्थिक परिस्थिती सुधारत असून, जमा झालेल्या मदत राशीतून पायाभूत सुविधापासून ते मजबूत पिंजरे व शेडची पुनर्बांधणी करणे ही कामे सुरू आहेतच. तरीही, त्यासाठी एकूण आर्थिक स्थिरता येणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी विविध संस्था व सामाजिक बांधिलकी जोपासणारे तसेच ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे अशांकडे मदतीसाठी आवाहन करणे उचित ठरेल. त्यासाठी 'वाढदिवस पुण्य कर्म योजना, दत्तक पालक योजना, कायम निवारा योजना' यासाठीही या संस्थेने आवाहन केले आहे.

■

**जनार्दन जोशी**

# वणवण वणवण - भारतातील आणि आयर्लंडमधील

**उदय कुलकर्णी**

'७२ मैल एक प्रवास' हा २०१३मध्ये प्रदर्शित झालेला मराठी सिनेमा. तो स्वर्गीय अशोक व्हटकर यांच्या आत्मवृत्त असलेल्या पुस्तकावर आधारित आहे. त्यात अशोक बारा वर्षांचे असताना, त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध साताऱ्याच्या बोर्डिंगमध्ये टाकण्यात आले होते. तिथून ते पळ काढतात आणि अनवाणी चालत ७२ मैल प्रवास करून, पुन्हा आपल्या कोल्हापूरला पोहोचतात. त्यांना वाटेत राधाक्का ही विपन्नावस्थेतील दलित स्त्री भेटते. तीही आपल्या चार मुलांसह अनवाणी त्याच रस्त्याने निघालेली असते. ती अशोकला मदत करते. अशी एकूण कथा आहे. त्या ७२ मैल प्रवासात त्यांना चांगले–वाईट अनुभव येतात, अर्थात वाईट अनुभवच जास्त असतात. या चित्रपटाला एक विलक्षण वेग आहे. तो केवळ त्या राधाक्काच्या चालण्यामुळे. आणि तो विलक्षण वेग चित्रपट पाहत असताना आपल्यातही भिनतो. तिच्या चालण्याला एक गती आहे. त्यात ती चालताना अजिबात थांबायलाही तयार नाही. त्या सतत चालण्याच्या प्रवासात तिची दोन मुले वाटेतच मरतात, तरीही ती न थांबता, चालतच राहते. तिचे चालत राहणे कळत–नकळतपणे आपल्यालाही बरोबर घेऊन जाते. दलित स्त्रीची भूमिका स्मिता तांबे यांनी खूप छान केलेली आहे.




'रोझी' नावाचा २०१८साली एक आयरिश सिनेमा पाहायला मिळाला. त्यातही रोझी नावाच्या एका स्त्रीची वणवण दाखवलेली आहे. अर्थात राधाक्का आणि रोझी यांच्या स्थितीत जमीनअस्मानाचा फरक आहे. 'रोझी' सिनेमा सुरू होतो, तेव्हा पडद्यावर लिहून येते, आयर्लंडमध्ये घरांचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे, अनेक लोक बेघर आहेत, भाडी परवडत नाहीत.

हा सिनेमा रोझी डेव्हीस व तिचा पार्टनर जॉन पॉल यांची व त्यांच्या चार मुलांची कहाणी आहे. खरेतर, ही कहाणी रोझी आणि जॉन यांच्या आयुष्यातील फक्त दोन दिवस–दोन रात्रींची आहे. रोझी व जॉनच्या चार मुलांपैकी मोठी मुलगी तेरा वर्षांची आहे, इतर लहान आहेत. हे कुटुंब राहत होते, ते घर घरमालक विकून टाकायचे ठरवतो. त्यामुळे ते त्यांना सोडावे लागते. मग त्यांचा नवीन घराचा शोध सुरू होतो. पण त्यांच्या बजेटमध्ये बसणारे घर काही त्यांना मिळता मिळत नाही. एक तर आयर्लंडमध्ये घरेच कमी आहेत आणि दुसरे भाडी भरमसाठ वाढलेली आहेत. जॉन हा एका हॉटेलच्या किचनमध्ये नोकरी करत असतो. त्यामुळे तो वेळ काढून काही घराचा शोध घेऊ शकत नाही. रोझीच चार मुलांना बरोबर घेऊन कारमधून फिरत फिरत, फोनवर चौकशी करत घरांचा शोध घेत आहे. ती फोनवर बोलते त्याची सुरुवात अशी :

हिया! (म्हणजे हाय!)
मी रोझी
मी भाड्याने एक रूम शोधत आहे,
फॅमिली रूम,
एका रात्रीसाठी,
तीन–चार रात्रींसाठी मिळाली तर छान,
जास्त दिवसांसाठी मिळाली तर फारच छान,
..
एनीवे थँक्स.

तिच्या एनीवे थँक्सवरून कळते, की तिला रूम मिळालेली नाही. कधी ती फक्त थँक्स म्हणते, तरीही कळते तिला रूम मिळालेली नाही. सतत ती हेच बोलते आहे. त्यातून आपल्याला तिचा शोध दिसतो. तो शोधच सिनेमाला गती देतो.

ज्यांची कुठेच सोय होऊ शकत नाही त्यांची नगरपालिका हॉटेलमध्ये व्यवस्था करते, म्हणजे त्याकरता

मदत करते. मग हॉटेलना फोन करणे, निदान एका रात्रीची सोय व्हायला पाहिजे. पण हॉटेलमध्येही अशा लोकांची गर्दी आहे. तिथे सोय होईलच याची खात्री नाही. रोझी मधेच मुलांना शाळेत सोडते. कधी प्रत्यक्ष कुणाला भेटून बघते. यात नातेसंबंधांचे विलक्षण, विचित्र नमुनेही पाहायला मिळतात. एक जवळचा नातेवाईक आता आमच्याकडे जागा नाही असे तिला सरळ सांगतो. रोझीची आई आणि रोझी यांच्यात वाद आहे. रोझीची आई म्हणते, तुला माझ्या घरी राहायचे असेल, तर आत येण्याआधी तू वडिलांविषयी चुकीचे बोलली आहेस ते तुला मान्य करावे लागेल. वडील आता हयात नाहीत, पण आईसाठी रोझीचे तसे मान्य करणे महत्त्वाचे आहे. मात्र रोझी त्याला अजिबात तयार नाही. तिच्या वडिलांनी बहुतेक काही गैरकृत्य केलेले आहे. रोझीची आई रोझीला निदान मुलांना माझ्याकडे ठेवून जा म्हणते, पण रोझी त्यालाही तयार होत नाही. अशारीतीने रोझीचा जगण्यासाठी घराचा शोध आपल्यालाही बरोबर घेऊन जातो.




'७२ मैल एक प्रवास'मधील राधाक्का आणि ही रोझी यांच्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे राधाक्का कंगाल आहे. तर रोझी सुखी मध्यमवर्गीय आहे. तिचा सुखाचा संसार सुरू असतानाच, अचानक घरमालक घर विकून टाकायचे बेत आखतो. अशात कुणी तिला उपरोधाने होमलेस – बेघर – म्हटले, तर ती दुखावली जाते. आपल्याला घर नाही हे ती लपवायला बघते.

हे असे 'रोझी' सिनेमाचे कथानक घेऊन, दिग्दर्शकाने ते इंटरेस्टिंग केले आहे. घर नाही. हा विषय व त्याचा शोध हाच फक्त फोकस ठेवला आहे. आणखी घटना आणून, दुःख वाढवणे दूर ठेवलेले आहे. ते छान जमलेले आहे. रोझीच्या भूमिकेत सारा ग्रीन आहे. तिचे काम चांगले आहे.

हॉलिवूडपट जगातील अनेक देशात बघितले जातात, त्यामुळे अमेरिकी समाज व संस्कृतीची माहिती जवळपास पूर्ण जगालाच झालेली आहे. तसेच इतर देशाचे सिनेमा बघायला मिळतात, तेव्हा त्या देशातील सामाजिक परिस्थिती व संस्कृती कळते. या सिनेमावरून आयर्लंडमध्ये घराची समस्या किती बिकट होती, ते तर थेट कळते. शिवाय इतरही गोष्टी लक्षात येतात. रोझी आणि जॉन हे पार्टनर आहेत, ती त्याला नवरा म्हणत नाही आणि त्यांना चार मुले आहेत. याचा अर्थ लग्नाशिवाय राहिलेले तिथे चालते, म्हणजे हे कोणाला आधुनिक वाटू शकेल. त्याचबरोबर त्यांना चार मुले आहेत, तिथे धार्मिक कारणांमुळे गर्भपात विरोधी भावना आहेत. बहुतेक कृत्रिम साधनांनासुद्धा विरोध असेल, त्यामुळेच चार मुले असावीत. सिनेमा बघताना आयर्लंडमधील सविता हलप्पनवार या भारतीय वंशाच्या महिलेची केस आठवते. सविताच्या गरोदरपणात गुंतागुंतीची स्थिती झाली होती. सतरा आठवड्यांचा गर्भ होता. स्पष्ट गुंतागुंत असूनही व सविताने विनंती करूनही हॉस्पिटलच्या मेडिकल टीमने गर्भपाताचा विचार करण्यास नकार दिला. त्यातच सविताचा मृत्यू झाला. नंतर बराच गदारोळ होऊन गर्भपाताच्या कायद्यात तिथे सुधारणा झाली. म्हणजे एकाच वेळेला हा देश काही बाबतीत नव्या विचारांचा, तर काही बाबतीत कट्टर धार्मिक जुन्या विचारांचाही दिसतो. तिथे शाळा लहान मुलांच्या संवेदनांबाबत किती जागरूक आहे, ते एका प्रसंगातून पाहायला मिळते. असे इतर देशांचे सिनेमे आणि आपल्याकडील सिनेमे पाहताना त्यातील बारकावे आणि साम्यसुद्धा आपल्याला समजतात.

रोझी (Rosie) हा चांगला सिनेमा आहे. पाहायला मिळाला तर अवश्य पाहा.

■

**उदय कुलकर्णी**
१०१ वंदना अपार्टमेंट, खारोडी, मार्वे रोड,
जनकल्याण नगर, मालाड (प.), मुंबई ४०००९५
सेल : ९८६९६ ७२६९६
इमेल : kuluday94@gmail.com

# १४ वर्षे अनेक मैल पदयात्रा करणारा महान पदयात्रिक : संत विनोबा भावे

**बिपिनचंद्र ढापरे**

**बा**लपणात विनायक भावे यांचा बालमित्र त्यांना सांगत होता. 'महाराष्ट्रात साधुसंत पुष्कळ झाले. पण कोकणस्थ ब्राह्मणात कोणी संत झाला नाही.'

आणि दोघे मित्र संतांची यादी करायला बसले. साऱ्या संतांची नावे लिहून झाली, पण त्यात कोणा कोकणस्थ ब्राह्मणाचे नाव आलेच नाही. मित्र नाराज झाला. मात्र विनायक नाराज झाला नाही आणि तो म्हणाला, ''मीच होतो कोकणस्थातला संत.''



या गोष्टीला बराच काळ लोटला. पुढे १९५१ साली विनायक भावे यांच्या त्याच मित्राला वर्तमानपत्रात वाचावयास मिळाले, 'संत विनोबांनी आंध्र प्रदेशात भूदान यज्ञ सुरू केला.'

विनोबांच्या नावापुढे 'संत' शब्द वाचून त्यांच्या बालमित्राचे डोळे आनंदाने भरले. भूदान चळवळीचे प्रवर्तक विनोबा भावे यांचा जन्म गागोदे (पेण तालुका) गावी झाला.

त्यांचे वडील नरहरपंत भावे सयाजीराव गायकवाड महाराजांच्या सेवेत होते. त्यांनी विनोबांना शिक्षणासाठी बडोद्यास बोलावून घेतले. परंतु विनोबांना विद्यापीठाचे आकर्षण नव्हते. त्यांना आचार्यपीठ हवे होते. प्राचीन गुरुकुल आश्रमव्यवस्था त्यांना हवी होती. म्हणून त्यांनी कोणाला न सांगता बडोदा सोडले व काशी गाठली. घरी खुशालीचे फक्त पत्र पाठवले. त्यात म्हटले की, 'माझ्या हातून कोणतेही अनैतिक काम होणार नाही, एवढी आशा बाळगावी.''

काशीत विनोबाजी दुर्गा घाटावर एका छोट्या खोलीत राहत. अन्नछत्रात जेवत, दोन पैसे दक्षिणा मिळायची. सारा दिवस अभ्यास करत. कधी कधी गंगेच्या तटावर बसून कविता रचत. ते काव्य विनोबा गंगामाईच्या ओटीत टाकत. त्यांना अध्यात्माचे वेध लागले होते. अशा संभ्रमावस्थेत असतानाच, ७ जून १९१६ रोजी महात्मा गांधीजींची भेट झाली आणि त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले.

गांधीजींनी विनायकाचे 'विनोबा'त नामकरण केले. त्यानंतर तेच नाव प्रचलित झाले. सर्वप्रथम गांधीजींनी विनायकास शरीरबल करावयास सांगितले. त्यांची आज्ञा मानून विनायक वाईला गेले. योगशास्त्राचा अभ्यासाबरोबर ३०० सूर्यनमस्कार, ७-८ मैल चालणे, साधा आहार घेणे यामुळे त्यांचे शरीर बलवान झाले. गांधीजींच्या आश्रमातील साधे जीवन त्यांना आवडले. साबरमती आश्रमात विनोबा होते, तेव्हा मेहनतीची पुष्कळ कामे करत. त्यांच्या लेखी काम हीच प्रभूपूजा होती. त्यामुळे ते मन लावून काम करत.

शेठ जमनालाल बजाज ह्यांची इच्छा होती की, साबरमतीसारखा आश्रम वर्धा येथे सुरू करावा. म्हणून त्यांनी बापूंनाच वर्ध्याला येण्याचा आग्रह केला. परंतु गांधीजींना गुजरात सोडायची इच्छा नव्हती. मग विनोबांना तरी वर्ध्यात पाठवा, असा आग्रह बजाज यांनी केला. त्याला मान्यता मिळाली. ८ एप्रिल १९२१ रोजी सहा साथीदारांसह विनोबा वर्ध्याला पोहोचले. जात्याची पूजा करून दळण दळून विनोबांनी वर्धा आश्रमाची स्थापना केली. पुढे विनोबाजी नवी पिढी तयार करण्यात गुंतले. खादीग्रामोद्योगाला विनोबा ग्रामीण अर्थशास्त्राचे महत्त्वाचे अंग समजत. १९२३ मध्ये 'महाराष्ट्र धर्म' मासिक सुरू झाले. त्यातील त्यांच्या लिखाणामुळे मासिक लोकप्रिय झाले.

नागपूरच्या झेंडा सत्याग्रहाच्या वेळी सरकारने स्वयंसेवकांसह विनोबांना पकडले आणि जेलमध्ये ठेवले. त्यावेळचे जेलचे जीवन कष्टमय होते. विनोबाजींना ८-९ फुटांच्या खोलीत ठेवले होते. त्या छोट्या खोलीतसुद्धा विनोबा रोज १० मैल रपेट करीत. म्हणजे जवळ जवळ अनेक फेऱ्या मारत आणि तोंडाने पाठांतर असलेल्या कविता

म्हणत. अन्य कैदी त्या जागेत कंटाळून जात. विनोबा मात्र आनंदाने राहत.

संस्कृतच्या अध्ययन-अध्यापनामुळे गांधीजींनी विनोबांना आचार्य ही पदवी दिली. पुढे तब्येत बिघडल्यामुळे विनोबा वाईला येऊन राहिले. तेथील वास्तव्यात त्यांनी उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, शांकरभाष्य, मनुस्मृती, पातंजल योगशास्त्र आदींचा अभ्यास केला. प्रकृती सुधारल्यावर पुन्हा साबरमतीला परतले.

पुढे १९३२ सालच्या सत्याग्रहात विनोबांनी भाग घेतला. त्यांना अटक होऊन धुळ्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तेथे त्यांनी गीतेवर प्रवचने दिली. त्यांचे परममित्र साने गुरुजी यांनी ती तशीच्या तशी टिपून घेतली. पुढे 'गीता प्रवचने', 'गीताई' ही त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली.

खरेतर, गीता मराठीत अनुवादित करण्यास विनोबांच्या आईनेच ते लहान असताना त्यांना सांगितले होते. 'गीता आणि आई' या एकच आहेत, असे त्यांचे विचार होते.

गीताई माऊली माझी, तिचे मी बाळ नेणतां।
पडता रडता घेई, उचलुनि कडेवरी।।

विनोबा आणि साने गुरुजी हे विसाव्या शतकातील कोकणस्थ संतपुरुष. भागवत धर्माची पताका फडकविणाऱ्या सर्व जाती-धर्मातील संतानी पंढरपूर हेच आपले माहेर मानले होते. तरीही पंढरपूरच्या विठोबाचे मंदिर नंतरच्या काळात सर्व जातीधर्माच्या लोकांना खुले नसावे, याचे दुःख विनोबा भावे व साने गुरुजी या दोन कोकणस्थांना वाटत होते. पंढरपूरचे विठोबाचे मंदिर सर्वांना खुले व्हावे, म्हणून साने गुरुजींनी उपोषण केले. विनोबांनी त्यांना नैतिक बळ दिले. पुढे मंदिर सर्वांना खुले झाले. थोडक्यात,दोन कोकणस्थ संतपुरुषांमुळेच हे घडले.

विनोबा हे प्रज्ञावंत महर्षि होते. भारतीय संस्कृतीचे पाईक होते. ते प्रवचनांसाठी भारतभर फिरले. त्यांनी सारा देश पाहिला. मूठभर लोकांच्या हातात प्रचंड जमीन आहे, तर असंख्य शेतकरी अल्प शेतीवर कशीबशी गुजराण करत आहेत. शेजमजूर म्हणून त्यांना हलाखीचे जीवन कंठावे लागते. हे दृश्य त्यांनी पाहिले. एकदा इ.स. १९५१ मध्ये आंध्रमध्ये पोचमपल्ली या गावी विनोबांचे प्रवचन होते. तेथील शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती पाहून विनोबांना कळवळा आला. त्यांनी तेथील सभेत आपल्या अमोघ वाणीने, हृदयाचा ठाव घेणाऱ्या वक्तृत्वाने भूदानासंबंधित आवाहन केले होते. त्यावेळी एका मोठ्या जमीनदाराने आपली शंभर एकर जमीन दान दिली. विनोबांना मिळालेले हे पहिले भूदान.



भूदान चळवळीमुळे त्यांना मानवतेच्या कल्याणाचा चिरंतन मार्ग सापडला. भगवद्गीतेची शिकवण त्यांच्या जीवनात पूर्णपणे भिनलेली होती. ईश्वरावरील श्रद्धा हीच मानवतेचा पाया असे ते मानीत. त्यानुसार अखेरपर्यंत विनोबांनी मानवकल्याणाकरीता आपले जीवन व्यतीत केले.

महावीरासारखे इंद्रियांवर मात मिळविणारे ते जितेंद्रिय होते. अजिंक्य होते. १५ नोव्हेंबर १९८२ मध्ये विनोबांनी 'गीताई', 'गीताप्रवचने' शिवाय अनेकानेक स्फूट विचार मागे ठेवून सकाळी 'राम हरी' म्हणत देहयात्रा संपविली. भारत सरकारने त्यांना १९८३ मध्ये मरणोत्तर 'भारतरत्न' देऊन त्यांचा सन्मान केला.

विनोबांचे विचार मोलाचे आहेत. ते सांगत- ''अध्यात्माने जीवनाला दिशा मिळते, तर विज्ञानाने जीवनाला गती मिळते. अध्यात्म्याला विज्ञानाचे मार्गदर्शन हवे आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठी विज्ञानाला अध्यात्माची जोड हवी. कारण विज्ञानात जर हिंसा आली, तर जीवनाचा सर्वनाश होईल. मात्र विज्ञानात जर अध्यात्म आले, तर मग सर्वोदय होईल.''


■

**बिपिनचंद्र अनंत ढापरे**
मोबाईल : ९६३७३२३१२९

# नमामी देवी नर्मदे

## सुषमा घाटे

आज परिक्रमेस सुरुवात होणार आहे. पहाटेच उठून, झुंजूमुंजू झणकारत असतानाच, ओंकारेश्वरच्या नागर घाटावर आम्ही आलो. परिक्रमेचा संकल्प करायचा आहे. शुभकार्यास आरंभ करताना वडिलधाऱ्या लोकांना नमस्कार करायला सांगतात, तसे मी नर्मदा मैय्येच्या उसळणाऱ्या पात्रात उतरून सूर्यास नमस्कार केला. स्नान केले. पाण्यात काही क्षण तरी मी लहान बालिका झाले. पाण्यात खेळले, बागडले. नको गिझरचे गरम पाणी नी बंदिस्त शुभ्र बाथरूम! नर्मदा मैय्येने माय होऊन स्नान घातले. सूर्यास अर्घ्य दिले. त्या वेळी घरातल्या लहान-मोठ्यांची आठवण काढली. छोट्या नातवंडांची बोटे पकडली आणि मोठ्यांबरोबर



संकल्प घेऊन निघालो. शुभ्र वस्त्र परिधान केली. यशोधनने त्या वेळी आमचे लेकी बाळींसारखे कौतुक केले. नथी घालायल्या दिल्या, गजरे माळले. सगळ्याजणी शुभ साड्यांमधे सुंदर सजल्या.

नैसर्गिक वातावरणात आपला आनंद द्विगुणित होतो, सुंदर दगडी बांधलेला घाट, सूर्याची पसरलेली सोनेरी किरणे, पलीकडील तटावरली गर्द हिरवीगार झाडी. खळखळणारी नर्मदा! त्यावेळी नर्मदा अगदी जवळची सखी वाटत होती.

संकल्पासाठी घाट सजला होता. फुलांनी पायऱ्या सजल्या, आसन लागली आणि आम्ही मैत्रिणी जवळ जवळ बसलो. त्याक्षणी मनांत कोणताही विचार नाही, केवळ शांत भाव!!

प्रकाशसरांनी सांगितले होते, नर्मदा मैय्या तुम्हांला कोणत्याही स्वरूपात भेटते.

याचा मी एक अर्थ शोधला होता. खरे वागायचे, नको म्हणायचे नाही व हवे म्हणायचे नाही.

कलियुगातली ही एकमेव मैय्या पापनाशन करणारी आहे. आपल्याला आयुष्यातल्या प्रत्येक अनुभव परिक्रमेत येतो.

परिक्रमेत हजारो शिवलिंग आहेत. शिवाने नर्मदेस अंगा खांद्यावर खेळवत ठेवलेय.

महाकली भयंकर कोपली होती, त्यावेळी तिला शांत करण्यास शिवाने तांडव केले. तांडव करण्याने शंकराचा घाम ओघळला, त्याची नर्मदा झाली. नरापासून मादीचा जन्म ती नर्मदा!

गुरुजींचे आगमन झाले. त्यांनी यथासांग संकल्प करविला. दुग्धाभिषेक केला. आरती केली नर्मदाष्टक म्हणाले आणि खऱ्या अर्थाने परिक्रमा पार पडली.

संकल्प करताना डोळे आपसूक मिटून, ध्यान लागत होते. समोरच्या प्रवाहात रेती खालून वर येतेय असे बंद डोळ्यांना दिसतेय. ती वाळू हळूहळू शिवलिंग स्वरूपात दिसली आणि त्या ठिकाणी एक विवाहाच्या वेदीवर जाण्यास सज्ज रेवा दिसू लागली. जरतारी लालचुनरी व जरीची वेलबुट्टी काढलेला कशिदा, सुंदर चेहरा रक्तवर्णी कुंकवाचा टिळा, नाकात आकर्ण नथणी त्यामध्ये आकाशीचे तारे, हातभर लालभडक कंकणे, अर्धोन्मीलित नयन तेजस्वी तरीही करुण झाक!!!

नर्मदा मैय्या पहिल्याच भेटीत दर्शन देऊन गेली. त्या अपूर्व योगाने गुरुजींचे मंत्र ऐकायला येतच नव्हते. मी पुन्हा डोळे उघडतेय मैत्रीण काय करतेय तसे करतेय!

आणखी काहीच सांगता येत नव्हते. वातावरण मंत्रीत झाले होते. संकल्पानंतर कुमारीका पूजन केले व आम्ही निघालो!

परिक्रमा म्हणजे, आपल्यातील अभिमानाची पुटे आपोआप गळून पडतात. तृप्तता कशी, समाधान कसे ते आजमावण्यासाठी परिक्रमा करावी. सातपुडा व विंध्य पर्वतामधून नर्मदा वाहते. जणू शिवाने तिचे संरक्षण करण्याची

जबाबदारी या दोन पर्वत असणाऱ्या भावांना दिली आहे.

बालभोग झाला. मग आम्ही रावेरखेडकडे निघालो. नर्मदेस उजव्या हाताला ठेऊन परिक्रमेस सुरुवात झाली.

रावेरखेडी नर्मदा काठी श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे प्राण अमरत्वात विलीन झाले.

येथील नर्मदा शांत स्थिर जाणवते.

मुत्सदी पेशवे, महापराक्रमी पेशवे, शिवाजी महाराजांप्रमाणेच त्यांची रणनिती.त्यांचे व्यक्तिमत्त्व जबरदस्त होते.१७०० ते १७४० येवढेच आयुष्य यांना लाभले होते १७२० ते १७४० या काळात श्रीमंतांच्या हातून कार्य परमोच्च असेच घडले.

फरसबंदी बांधकाम अनेक ओवऱ्या व टेहळणीसाठी जागा. मध्यभागी श्रीमंतांची समाधी चबुतरा बांधलेला आहे. पेशव्यांनी नर्मदाकाठी अनेक महिने शत्रूला अडकवून वेठीस धरले होते.

आम्ही बघितले साष्टांग दंडवतही कमी पडेल असे हे स्थान! सर माहिती सांगत होते. उर भरून आला होता. हे शौर्य, हे धैर्य ही स्वामी निष्ठा!!!

आपल्यातल्याच लोकांची होती. हे नर्मदेचेच पाणी आहे!!!

नर्मदे हर हर...

एकापेक्षा एक विलक्षण वास्तव अनुभवणे, म्हणजेच खरी परिक्रमा. त्यामुळे आपल्या मनातील जळमट गळून पडली, तर नशिबच म्हणावे लागेल.

कुरंग नदीकडून लेपा गावी आलो. लेपा गाव आणि भारतीताई ठाकूर यांचे नाते नर्मदेने घट्ट बांधले होते. हे ठाकूरबाईंना स्वप्नातही नसेल.

भारतीताईंनी दोन मैत्रिणींबरोबर पायी परिक्रमा केली. कॉलेजमधील मस्त मैत्रिणी परिक्रमेत ताऊन सुलाखून एक जीव झाल्या असतील. भारतीताईंना इकडचे आदिवासी लोक त्यांचा अशिक्षितपणा, विशेषत: मुलांना घासभर अन्न मिळवण्यास करावी लागणारी जंगलातली वणवण, ना घर ना आसरा, हे पाहून या ताईंनी स्वत:शी खूण गाठ बांधली. महाराष्ट्रातले आपले सगळे कार्य बंद करून त्या लेपाला आल्या. आदिवासीसाठी झटल्या शाळा उभ्या केल्या. त्यांनी शारीरिक व मानसिकही अपार कष्ट केलेत. आम्ही फक्त देणगी देतो मेहनत किंवा मनांनी गुंतत नाही.

आज त्यांचे एक विश्व आहे. मोठी शाळा-कॉलेज आहे. तिथे मुंबई, ठाण्यातून हुशार व नामवंत लोक स्वच्छेने शिकवायला जातात. भारतीताईंना बुध्दीची चालती बोलती नर्मदामैय्या म्हटल्यास वावगे होणार नाही.

साधी राहणी आणि उच्च विचार सरणी

याची प्रचिती आली. नर्मदे हर हर...ही खरी परिक्रमा.

■


## ब्राह्मण सेवा मंडळ

**:: कार्यकारी मंडळ ::**

❑ **विश्वस्त**
श्री. पुष्कराज सोमण
श्री. विनायक लेले
श्री. सतीश मराठे
श्री. आनंद लिमये

❑ **कार्यकारी विश्वस्त**
श्री. संतोष वैद्य

❑ **अध्यक्ष**
श्री. गिरीश गोडबोले

❑ **उपाध्यक्ष**
श्री. दिलीप शेटे
श्री. विलास वैद्य

❑ **कार्याध्यक्ष**
श्री. अनिरुद्ध गोडसे

❑ **उपकार्याध्यक्ष**
श्री. सतीश विद्वांस

❑ **प्रमुख कार्यवाह**
श्री. कौस्तुभ महाजन

❑ **संयुक्त कार्यवाह**
श्री. श्रीनिवास वीरकर
सौ. संपदा भिडे

❑ **कोषाध्यक्ष**
श्री. हेमंत दीक्षित

❑ **उपकोषाध्यक्ष**
श्री. श्रीराम पाध्ये

❑ **सदस्य**
सौ. कल्पना साठे
श्री. दिनेश गानू
श्रीमती. शिल्पा सहसबुद्धे
सौ. अधिता लेले
श्री. सुभाषचंद्र मेहेंदळे
श्री. शिरीष सहसबुद्धे
सौ. स्वाती देवधर
श्री. अजय काळे

❑ **स्विकृत सदस्य**
श्रीमती ज्योत्स्ना देसाई
श्री. नीरज देशपांडे
श्री. संजय गोखले

# माझी अविस्मरणीय लेह लडाख टूर

मुग्धा विनोद जोशी

१९६२-६५ साली चीन - पाकिस्तान बरोबर भारताची लढाई झाली, तेव्हा माझे वडील (कै. श्री. दिलीप उंडे) लडाख बॉर्डरवर मिलेट्रीत कार्यरत होते. म्हणून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा लेख मी माझ्या बाबांना अर्पण करत आहे).

जुलै (welcome) म्हणून स्वागत करणाऱ्या आणि निसर्ग सौंदर्याने नटलेल्या लेह लडाखची टूर आम्ही २४ जुलै २०१६ रोजी एका प्रवासी टूर्स तर्फे केली. प्रथम जेट एअरवेज विमानाने श्रीनगर विमानतळ गाठले. २५ जुलैला सकाळी लवकरच निघून 'झोजिला पास' (१,१५०० फूट) वाटेने आम्ही कारगिलला पोहोचलो. २६ जुलैला कारगिल




विजय दिनाच्या औचित्याने 'द्रास' येथील कारगिल युद्धाच्या विजय स्मारकाला भेट दिली. त्यावेळी तोलोलिंग हिलवरील शत्रू सैन्याला गारद करून, भारतीय जवानांनी कारगिल युद्धात विजय मिळविला, त्या टेकडीला आणि तिथे डौलाने फडकणाऱ्या तिरंग्याला सॅल्यूट करताना अभिमानाने ऊर भरून आला. त्याचप्रमाणे कारगिल शहिदांच्या आठवणीने डोळ्यांत पाणी दाटले. या ठिकाणी कारगिल युद्धाच्या आठवणी जतन करणारे वॉर म्युझियम आहे. तिथले फोटोज आणि मॉडेल्स बघताना कारगिलचा इतिहास जागा होतो.

२७ जुलैला कारगिलहून लेहकडे जाण्यास निघालो. तिथला निसर्ग आपल्या अनोख्या रंगरूपाने मन मोहून टाकतो आणि जिथे भारतीय सैन्याची वीरगाथा अवतरते, तो प्रदेश म्हणजे लेह लडाख. भारतातील सर्वांत उंचावरचे पठार अशी ओळख असलेल्या लेह लडाखच्या डोंगररांगांचा अविभाज्य भाग म्हणजे, आपले लष्करी जवान. लडाखची सरहद्द पाकिस्तान आणि चायना त्या दोन्ही देशांना भिडलेली असल्याने संरक्षणाच्या दृष्टीने लेह लडाख मोस्ट सेन्सिटिव्ह प्रदेश आहे. जिथे सर्वसामान्य पर्यटकांना चार पायऱ्या चढल्यावरदेखील दम लागतो आणि विरळ हवेतून चालतानाही जीव घाबरतो; तिथे आपले शूर जवान मायनस डिग्रीची पर्वा न करता आणि हाय अल्टीट्युडची तमा न बाळगता, चोवीस तास सज्ज राहून आपल्या देशाचे रक्षण करतात. लेह लडाखच्या रंगांमध्ये भारतीय जवानांच्या शौर्याचा, पराक्रमाचा, धैर्यचा रंग मिसळलेला आहे. आज




आपले जवान लडाखच्या सीमेवर तळहातावर प्राण घेऊन सज्ज आहेत. त्यामुळेच आपल्या सर्वांच्या मनात भारतीय जवानांविषयी जी कृतज्ञता, आपुलकी, आदराची भावना असते ती व्यक्त करण्याची संधी लेह लडाख सहलीत आम्हांला हमखास मिळाली.

नॅशनल हायवे (NH1-D ) पकडून आम्ही 'लमायुरू' या छोट्याशा गावातील 'मुनलॅन्ड'ला पोहोचलो. मुनलॅण्डला लमायुरू गोम्फाचे भिक्षू मेडिटेशन करण्यासाठी राहतात. या ठिकाणी चंद्रावरील वाळू सारखी वाळू आढळते. 'निम्मू व्हॅली' येथे सिंधू आणि जांस्कर या दोन नद्यांचा संगम झाला, त्या ठिकाणी भेट दिली. सिंधू नदीचा रंग फिकट हिरवा आणि जांस्कर नदीचा रंग चमचमणारा निळा आहे. नंतर आम्ही 'मॅग्नेटिक हिल' जिथे गाडी न्युट्रलवर ठेवली, तरीही आपोआप गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध दिशेला खेचली जाते तिथे गेलो.

मग गुरुनानक ह्यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या 'गुरुद्वारा पथर साहिबा' येथे दर्शन घेतले. तिथे आम्हाला 'मराठा रेजिमेंट आर्मी'चे जवान भेटले. आम्ही महिलांनी त्यांना राख्या बांधल्या आणि त्यांचे मनापासून आभार मानले. शिवाय आमच्याकडे जो खाऊ होता, तो त्यांना भेट म्हणून दिला.

२८ जुलैला हेमिस, थिकसे, हॉल ऑफ फेम, शांती स्तूपांना भेट दिली. तसेच१७व्या शतकातील 'हेमिस मॉनेस्ट्री' पुरातन थंगकांसाठी प्रसिद्ध आहे. इथे कॉपरपासून बनविलेल्या 'बुद्धाचा पुतळा' आहे. गोल्ड आणि सिल्वर स्तूप आणि थान्गका पेंटिंग्स प्रसिद्ध आहेत. थिकसे मॉनेस्ट्री येथे ४० फूट उंच फ्युचर बुद्धाची मूर्ती पाहायला मिळते. त्यानंतर तारा टेम्पल, बौद्ध स्तूप, भित्तिचित्रे पहिली.

इंडियन आर्मीनिर्मित 'हॉल ऑफ फेम' म्युझियम हे भारत-पाकिस्तान युद्धात ज्या सैनिकांनी आपले आयुष्यपणाला लावले, त्यांच्या आठवणींसाठी प्रसिद्ध आहे. या म्युझियममध्ये दोन मजले आहेत. तळमजल्यावर




भारतीय जवानांची माहिती व त्यांनी वापरलेली शस्त्रे त्यांची माहिती आहे. त्या खेरीज भारतीय सैनिकांच्या आठवणींसाठी विशेषतः कारगिल आणि वेगवेगळी युद्ध यांना उजाळा देणाऱ्या वस्तू विक्रीचे दालन आहे. पहिल्या मजल्यावर 'सियाचीन ग्लेशियर'वर फोटो आणि माहिती दिली आहे. या संग्रहालयाला सियाचीनवर राहणारे आपले जवान कोणत्या तंबूत राहतात, इथपासून ते कारगिल युद्धात त्यांनी कोणत्या गन्स वापरल्या होत्या, इथपर्यंत अनेक प्रकारची सामग्री ठेवली आहे. वेगवेगळ्या युद्धातल्या जवानांच्या शौर्यगाथा फोटोजमधून पाहायला मिळतात आणि हे जवानच आपल्या 'आझादी के रखवाले' असल्याची जाणीव होते.

२९ जुलैला, 'नुब्रा व्हॅली' येथे गेलो. येथे 'सॅण्ड ड्यून्स' आहेत आणि त्याच्याभोवती जे पर्वत आहेत त्यांच्या डोक्यावर बर्फाची शिखरे आहेत. वाळवंट आणि बर्फ यांच्या अजब कॉम्बिनेशनमुळे या व्हॅलीला 'कोल्ड डेझर्ट' म्हणतात. इथे भर पडते ती 'बॅक्ट्रियन कॅमल' राईडची. या डबल हम्प कॅमल्सवर बसून नुब्राच्या वाळवंटात चक्कर मारताना आपण जणू जुन्या काळातले मुसाफिर आहोत, असा भास होतो. नुब्राच्या निवासात न चुकविण्यासारखी गोष्ट म्हणजे मन भरून टाकणारी शांतता आणि रात्रीच्या काळोखात लाखो चांदण्यांनी उजळलेल्या आकाशाचा देखावा. या व्हॅलीत आमचा तंबू स्टे होता. तसेच २९ जुलैला माझे यजमान श्री. विनोद जोशी यांचा वाढदिवसही आमच्या टूर्स तर्फे साजरा केला.



लडाख या नावाचा अर्थच मुळी 'लॅंड ऑफ हाय पासेस' असा आहे. सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे, 'खार्दुन्गला पास' (१८३८० फूट) या हायेस्ट मोटोरेबल रोडवरून केलेला प्रवास. लडाखच्या निसर्गाचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे, इथला बहुरंगी हिमालय. लेह लडाखचा हिमालय राकट रांगडा आहे, मात्र त्याला तांबड्या, जांभळ्या, पिवळ्या, मरून रंगाचे वरदान मिळालेले आहे. त्यामुळे वळणावळणावर प्रवास करताना समोरचा निसर्ग कॅमेरात बंदिस्त करण्याचा मोह आवरला नाही.

३० जुलैला आम्ही 'डिस्किट गोम्फा' या नावाने प्रसिद्ध असलेल्या 'डिस्किट मॉनेस्ट्री' ला भेट दिली. इथे ३२ मीटर (१०६ फूट) उंच मैत्रेय बुद्धाची मूर्ती आहे. या मॉनेस्ट्रीजवळच 'लाचुंग' टेम्पल पण आहे. डिस्किटजवळ 'तुर्तुक' हे युद्धाच्या निगडित असलेले गाव पाकव्याप्त




काश्मिरच्या सीमेवर आहे. १९७१ पर्यंत ते पाकव्याप्त काश्मिरचा भाग होते. पण आता तो भारताचा भाग आहे. ३–४ वर्षांपूर्वीच ते पर्यटकांना खुले करण्यात आले आहे.

३१ जुलैला हायेस्ट मोटोरेबल रोड 'चांगला पास' (१७५९० फूट) वरून 'पँगाँग लेक' (२९० ज्ञा १४२७ फूट) ला प्रयाण केले. निळ्या रंगाची निळाई मिळविणारा आणि 'थ्री इडियट्स', 'जब तक है जान' या सिनेमामधून फेमस झालेला पँगाँग लेक पाहिला, तेव्हा डोळे आणि मन एकाच वेळी तृप्त झाले. पँगाँग लेकचा ७०% भूभाग हा चीन मध्ये आहे. या नितांतसुंदर तलावाच्या आधी 'चुषुल' गाव आहे. १९६२ ची लढाई या गावाजवळ लढली गेली. त्यानिमित्त तेथे युद्ध स्मारक उभारले आहे.

१ ऑगस्ट रोजी, आम्ही 'लेह पॅलेस' पाहिला. हे शाही पॅलेस १७ व्या शतकात राजा सेंग्गे नामग्याल यांनी बांधले. हे पॅलेस नऊ मजले उंच आहे. आता याची पडझड झाली आहे. तरीही सुस्थितीत असलेला भाग आम्हाला पाहता आला.

लेह लडाख मध्ये फक्त डोळे आणि मनच नाही, तर आपली जीभ सुद्धा तृप्त होते. 'थुक्पा' आणि 'मोमो' प्रवासात सहज मिळतात. मोमो आणि सूप यांची एकत्र मजा चाखण्यासाठी 'मोकथुक' ट्राय करा. वेगवेगळ्या भाज्यांनी बनविलेले, थोडे गोड – तिखट असे व्हेज आणि नॉन व्हेज दोन्ही प्रकारातमिळते. इथे फिरताना ताजे अप्रिकॉट्स आणि अँपल विकणारे स्थानिक विक्रेते पाहायला मिळतात. तिबेटी लोकांनी तयार केलेल्या पारंपरिक हस्तकौशल्य असलेल्या वस्तू, गळ्यातल्या आकर्षक माळा ते भितींवर लावायच्या थंगकांपर्यंत कलात्मक वस्तू मोहून टाकतात. तसेच काश्मिरमधील पश्मिना शाली, कलाकुसर केलेले कार्पेट्स आणि लाकडी कोरीव कामाचे नमुने बार्गेनिंग करून, खरेदी करण्याचा आनंद काही वेगळाच.

भारतातील सिंधू संस्कृतीचे दर्शन घडवून सिंधूच्या तीरावरून होणारा नऊ–दहा दिवसांचा प्रवास आवर्जून सगळ्यांनी भेट द्यावा, असा अविस्मरणीयआणि विलोभनीय आहे.

■

**मुग्धा विनोद जोशी**
भ्रमणध्वनी : ९८६७०२३५३६
mugdhavjoshi@rediffmail.com



# वार्षिक सर्वसाधारण सभा २०१९-२०

वर्ष २०१९-२० ची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ५ सप्टेंबर २०२१ रोजी मंडळाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात Online पद्धतीने पार पडली. त्यावेळी सभेचे अध्यक्षस्थान श्री. गिरीश गोडबोले यांनी भूषवले. कार्यकारी विश्वस्त श्री. संतोष वैद्य, उपाध्यक्ष श्री. दिलीप शेटे, कार्याध्यक्ष श्री. अनिरुद्ध गोडसे, प्रमुख कार्यवाह श्री. कौस्तुभ महाजन, कोषाध्यक्ष श्री. सतीश विद्वांस यांनी सभेचे कामकाज पहिले. विश्वस्त श्री. विनायक लेले, श्री. पुष्कराज सोमण व श्री. आनंद लिमये यांनी आपले विचार सभेपुढे मांडले.

## नेरूळ प्रकल्प

नेरूळ प्रकल्पासाठी DNS बँकेकडून कर्ज घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. लवकरच कर्ज मिळून प्रकल्पाचे उर्वरित बांधकाम सुरु करण्यात येईल. नेरूळ प्रकल्पासाठी देणगीचे आवाहन सभासदांना केलेले होते. त्यास सभासदांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला व अजूनही मिळतो आहे.

## चक्रगती निवडणूक वर्ष २०२२-२३

दरवर्षी होणारी चक्रगती निवडणूक यावर्षी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कोविड परिस्थिती आटोक्यात असेल तर सरकारी नियमानुसार घेण्यात येईल.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची क्षणचित्रे









